# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक १९४ वा ❑ भारतीय सौर दिनांक २७ भाद्र. शके १९४८, शुक्रवार दि.१८ सप्टेंबर २०२६ ❑ पाने ६ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

### भारतीय महिला क्रिकेट संघाचा ऐतिहासिक विजय आणि प्रशासकीय त्रुटींची किनार

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

भारतीय महिला क्रिकेट संघाने नुकतेच श्रीलंका संघाचा ७२ धावांच्या मोठ्या फरकाने धुव्वा उडवत आशिया चषकावर आपले नाव कोरले. हा विजय केवळ एका स्पर्धेपुरता मर्यादित नसून, तो भारतीय महिला क्रिकेटच्या वाढत्या वर्चस्वाचा आणि सातत्याचा मोठा पुरावा आहे. आशिया चषक स्पर्धेचे विजेतेपद तब्बल आठ वेळा पटकावणारा भारतीय संघ हा क्रिकेटच्या इतिहासातील पहिलाच संघ ठरला आहे. ही ऐतिहासिक कामगिरी भारतीय क्रिकेटच्या सुवर्ण पानांवर कायमची कोरली गेली आहे. कोणत्याही एका खंडाच्या मुख्य स्पर्धेवर इतके निर्विवाद आणि एकतर्फी वर्चस्व प्रस्थापित करणे ही साधी गोष्ट नाही. श्रीलंका, पाकिस्तान किंवा बांगलादेश यांसारख्या प्रतिस्पर्धी देशांच्या आव्हानांना समर्थपणे परतवून लावत, भारतीय महिलांनी आशियाई क्रिकेटवर आपला जो दबदबा निर्माण केला आहे, तो खऱ्या अर्थाने कौतुकास्पद आहे.

मैदानावरील खेळाचा आणि आकडेवारीचा सखोल विचार केल्यास, अंतिम सामन्यात भारतीय संघाने फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण अशा तिन्ही आघाड्यांवर उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. ७२ धावांचा विजय हा आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये खूप मोठा मानला जातो. यावरूनच भारतीय खेळाडूंच्या शारीरिक तंदुरुस्तीचे आणि मानसिक एकाग्रतेचे दर्शन घडते. श्रीलंकेच्या संघाला कोणत्याही क्षणी सामन्यावर पकड मिळवता आली नाही आणि दडपणाखालीही भारतीय संघाने आपला नैसर्गिक खेळ उंचावला. गेल्या अनेक वर्षांतील भारतीय महिला क्रिकेटमधील सातत्य, खेळाडूंचे कठोर परिश्रम आणि बदलत्या काळानुसार संघाने स्वतःमध्ये घडवून आणलेली तांत्रिक प्रगती याचे हे मूर्तिमंत उदाहरण आहे. या विजयामुळे जागतिक स्तरावर भारतीय संघाचा आत्मविश्वास अधिकच दृढ झाला असून, आगामी जागतिक स्पर्धांसाठी संघाची पूर्वतयारी किती भक्कम आहे, हेच यातून सिद्ध होते.

मात्र, कोणत्याही आंतरराष्ट्रीय स्पर्धेत खेळातील विजयाइतकेच महत्त्व सामन्यानंतरच्या शिष्टाचारांना आणि आयोजन समितीच्या नियमांना असते. या ऐतिहासिक विजयाच्या आनंदोत्सवाला सामन्यानंतर झालेल्या एका अनपेक्षित आणि वादग्रस्त घटनेची किनार लाभली. पुरस्कार वितरण सोहळ्यात गंभीर स्वरूपाच्या प्रशासकीय आणि संवादात्मक त्रुटी पाहायला मिळाल्या. आशियाई क्रिकेट परिषदेचे अध्यक्ष मोहसीन नक्की हे मंचावर भारतीय संघाची वाट पाहत उभे होते. तब्बल ४० मिनिटे उलटूनही संघ मैदानात न आल्याने, ताटकळत उभे राहिलेल्या नक्की यांना अखेर मंचावरून निघून जावे लागले. आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये असा प्रदीर्घ विलंब हा आयोजक, खेळाडू आणि व्यवस्थापन यांच्यातील समन्वयाचा मोठा अभाव दर्शवतो. यामुळे केवळ वेळेचा अपव्यय होत नाही, तर आयोजनाच्या व्यावसायिकतेवरही गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण होते.

खेळाडू आणि प्रशासन यांच्यातील या अनाकलनीय गोंधळाचा थेट परिणाम स्टेडियममधील वातावरणावर झाला. उपखंडातील क्रिकेट चाहते हे अत्यंत भावनिकरित्या खेळाशी जोडलेले असतात. आपल्या संघाला विजयी होताना पाहण्याचा सर्वोच्च आनंद आणि त्याचवेळी पुरस्कार सोहळ्याला होत असलेला विलंब, यामुळे चाहत्यांच्या संयमाचा बांध फुटला. मंचावर एकटेच उभ्या असलेल्या मोहसीन नक्की यांना पाहून भारतीय चाहत्यांनी ट्रॉफी चोर, ट्रॉफी चोर अशा घोषणा देण्यास सुरुवात केली. गर्दीचे मानसशास्त्र नेहमीच उत्स्फूर्त असते. जेव्हा अचूक माहितीचा अभाव असतो आणि प्रेक्षकांशी कोणताही संवाद साधला जात नाही, तेव्हा अशा प्रकारच्या उत्स्फूर्त आणि काहीशा आक्रमक प्रतिक्रिया उमटतात. या घटनेचा व्हिडिओ वाऱ्यासारखा पसरल्याने, मैदानावर मिळवलेल्या ऐतिहासिक यशाला या वादाचे गालबोट लागले.

क्रीडा स्पर्धांचे यश केवळ मैदानावरील खेळावर अवलंबून नसते, तर मैदानाबाहेरील प्रशासकीय व्यवस्थापन आणि शिस्त यावरही ते तितकेच अवलंबून असते. असे प्रसंग टाळण्यासाठी क्रिकेट मंडळ आणि आयोजक समित्यांनी आपल्या संवाद यंत्रणेत काही संरचनात्मक बदल करणे अत्यंत गरजेचे आहे. खेळाडू, संघ व्यवस्थापन आणि आयोजक यांच्यातील समन्वयासाठी एका स्वतंत्र आणि जबाबदार संपर्क अधिकाऱ्याची नियुक्ती करणे हा यावरील प्रमुख उपाय आहे. सामन्यानंतरचा आनंदोत्सव आणि अधिकृत पुरस्कार वितरण सोहळा या प्रक्रियेत कुठेही संवादाची दरी निर्माण होऊ नये, यासाठी या अधिकाऱ्याने दोन्ही बाजूंना वेळेची पूर्वकल्पना देणे आवश्यक आहे.

स्टेडियममध्ये उपस्थित असलेल्या प्रेक्षकांशी संवाद साधणारी यंत्रणा अधिक पारदर्शक आणि तत्पर असली पाहिजे. ज्यावेळी कोणत्याही प्रशासकीय किंवा तांत्रिक कारणामुळे पुढील कार्यक्रमास विलंब होत असतो, त्यावेळी मैदानातील उद्घोषकांच्या माध्यमातून आणि स्टेडियममधील महाकाय पडद्यांचा प्रभावी वापर करून प्रेक्षकांना योग्य ती माहिती देणे गरजेचे आहे. अचूक माहितीअभावी प्रेक्षकांमध्ये संभ्रम निर्माण होतो आणि त्यातून चुकीच्या घोषणाबाजीसारखे प्रकार घडतात. संवादाच्या अभावातून आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर कसा गोंधळ उडू शकतो आणि एका क्षुल्लक चुकीचे रूपांतर मोठ्या विवादात कसे होऊ शकते, याचे हे एक प्रातिनिधिक उदाहरण ठरले आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेट संस्थांनी सामन्यानंतरच्या शिष्टाचारांसंबंधी अधिक कडक नियमावली तयार करून, वेळेचे काटेकोर नियोजन आणल्यास, अशा प्रकारच्या प्रशासकीय त्रुटी भविष्यात नक्कीच टाळता येतील आणि खेळाच्या प्रतिष्ठेला कोणताही धक्का लागणार नाही.

या प्रसंगामुळे भविष्यातील आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये अशा प्रशासकीय त्रुटी टाळण्यासाठी नव्या आचारसंहितेची गरज आहे.

# तणावपूर्ण जीवनशैलीतून बाहेर पडण्यासाठी संगीताची साथ आवश्यक-अनिल काटदरे

## ‘स्वररफी’ कार्यक्रमात सदाबहार गीतांची सुरेल मैफल; संगीतप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद, नवोदित कलाकारांना व्यासपीठ देण्याची परंपरा कायम

**ज्योतिर्मय साहित्य**

सातारा – आजच्या धावपळीच्या आणि तणावपूर्ण जीवनशैलीत प्रत्येकाने स्वतःसाठी एखादा छंद जोपासणे अत्यंत गरजेचे आहे. आपला मसाले व विविध उत्पादनांचा व्यवसाय गणिती आणि काहीसा रुक्ष स्वरूपाचा असला, तरी या रुक्षतेतून बाहेर पडून मनःशांती आणि आनंद मिळविण्यासाठी संगीत हे उत्तम माध्यम आहे, असे प्रतिपादन उद्योजक अनिल काटदरे यांनी केले.

दीपलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, सातारा आणि संगीतप्रेमी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ‘स्वररफी’ या संगीत कार्यक्रमात ते बोलत होते. मंगळवारी (दि. ८) सायंकाळी ५.३० वाजता शनिवार पेठेतील दीपलक्ष्मी सांस्कृतिक हॉलमध्ये हा कार्यक्रम झाला. रफी यांच्या अजरामर गीतांनी रंगलेल्या या सुरेल मैफलीला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

अनिल काटदरे यांनी आपण संगीताचे रसिक असल्याचे नमूद केले. व्यवसायाच्या धावपळीतून काही क्षण स्वतःसाठी काढणे आणि कलेच्या माध्यमातून मनाला आनंद देणे



आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल त्यांनी संगीतप्रेमी आणि सहकाऱ्यांचे आभार मानले.

यावेळी किशोर देशपांडे यांनी भारत विकास परिषदेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी समूहगान स्पर्धा, प्रश्नमंजूषा तसेच दिव्यांग बांधवांसाठी विविध सेवाकार्य उपक्रम राबविले जात असल्याचे सांगितले. अशा उपक्रमांतून तरुण पिढीवर संस्कार घडतात. जुन्या गाण्यांमधील आशयपूर्ण शब्द आणि संगीतामधून कौटुंबिक मूल्ये व संस्कार जपले जातात. संगीताच्या कार्यक्रमांमुळे समाजातील विविध घटकांना एकत्र आणण्यास मदत होते, असे त्यांनी स्पष्ट केले. संगीतप्रेमी ग्रुपच्या कार्याला शुभेच्छा देताना भारत विकास परिषदेतर्फेही अशाच प्रकारचा संगीतमय उपक्रम आयोजित करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.

शिरीष चिटणीस म्हणाले, कराओके हे समाजातील सर्व स्तरांतील आणि विविध वर्गांतील नागरिकांना एकत्र आणणारे प्रभावी माध्यम आहे. दैनंदिन जीवनातील मतभेद, वेगवेगळे विचार आणि संस्कार बाजूला ठेवून केवळ निखळ संगीताचा आनंद घेण्यासाठी हे व्यासपीठ काम करते. दीपलक्ष्मी पतसंस्था आणि साताऱ्यातील सांस्कृतिक चळवळीचे गेल्या २९ वर्षांपासून अतूट नाते आहे. संगीतप्रेमी ग्रुपचा हा २४ वा कार्यक्रम असून नवोदित कलाकारांना नेहमीच हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात येते, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमात अपर्णा गायकवाड, स्नेहल चिंचणे, विनयकुमार, प्रमोद लोंढे आणि राजेंद्र पाटील यांनी रफी यांच्या सदाबहार गीतांचे सादरीकरण केले. एकापाठोपाठ एक लोकप्रिय गीते सादर होत असताना रसिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात कलाकारांना दाद दिली.

कार्यक्रमास अनिल काटदरे, हेमंत कासार, गिरीश दोशी, किशोर देशपांडे, गोपाळ काळे, प्रकाश बडदरे, शिरीष चिटणीस (संस्थापक-अध्यक्ष, दीपलक्ष्मी पतसंस्था), विनय कुलकर्णी, प्रमोद लोंढे व राजेंद्र पाटील यांच्यासह संगीतप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन प्रमोद लोंढे, राजेंद्र पाटील आणि विनयकुमार (संस्थापक, संगीतप्रेमी) यांनी केले.

# शिक्षण एक दृष्टिकोण

**ज्योतिर्मय साहित्य**

सध्या सर्वांना सगळ्या विषयी माहिती घेण्याची उत्सुकता असते. कला, शास्त्र, संख्या शास्त्र, रोबो इ. विषयात संबंधित नसलेल्यांना पण रुची असते. गीर्यारोहण करणारे नसले तरी त्यासंबंधी वाचनात रुचि घेतली जाते. स्वतः जाणार नसलो तरी नर्मदा परिक्रमा संबंधी लिखाण वाचले जाते. चित्र काढता येत नसले तरी पुस्तकांच्या मुखपृष्ठावर नजर रेंगाळते. शिक्षण हा विषय शिक्षक नसणाऱ्यांना पण अनेक गोष्टी लक्षात आणून देऊ शकतो.

उदा- अभ्यासक्रम सतत बदलला जातो कारण वेगवेगळ्या क्षेत्रात झालेली प्रगती कळणे जरुरी असते. काही वर्षा नंतर भारताची अंतराळ प्रयोगशाळा स्थापन झाली किंवा दुसऱ्या ग्रहावरुन दुर्मिळ उपयोगी खनिजे आणली तर त्याची माहिती द्यावी लागेल. परंतू त्यापूर्वी येथपर्यंत कसे आलो हे पहावे लागेल. अधिक विस्तारात न जाता शिक्षणासंबंधी काही मुद्दे लिहीत आहे.

शिक्षण हे ज्ञान घेणे सुलभ करते व एखादी गोष्ट करावी कशी हे सांगते. तसेच ते अधिक चांगले शिकविण्यास मदत करते. शिक्षणास कोणतीही मर्यादा नसते. शास्त्राच्या अनेक शाखा असल्या तरी त्या परस्परावर अवलंबून असतात. उदा. पेशी चा अभ्यास जीवशास्त्रांतर्गत केला जातो पण निरीक्षणासाठी लागणारा सूक्ष्मदर्शक



भौतिकशास्त्राची निर्मिती आहे.

विद्यार्थी, शिक्षक व शिकविले जाणारे विषय हे शिक्षण प्रक्रियेत महत्वाचे घटक आहेत. शिक्षण प्रक्रियेत विद्यार्थ्यांची अनुवंशिकता, शारिरीक क्षमता, सामाजिक स्थिती, मानसिकता आणि वाढते वय इ. चा विचार केला जातो. अभ्यासक्रम व शैक्षणिक पध्दतींचा विचार करावा लागतो. तंत्रज्ञान पण जरुरी आहे.

**शिक्षण शास्त्र...**

अशोक जवळेकर,
डोंबिवली (प). जि. ठाणे.
9892045737.



जीवशास्त्राच्या अभ्यासामुळे शिक्षणात मानवाच्या मेंदू चा प्रमस्तिष्क हा भाग तुलनेने मोठा आहे, गर्भावस्थेचा कालावधी इतर प्राण्यांच्या तुलनेत अधिक आहे. तसेच मन हा अभ्यासाचा विषय आहे.

ज्याप्रमाणे वनस्पति पोषण करणाऱ्या मातीत वाढतात, त्याचप्रकारे मनाचा शरीरांतर्गत विकास होतो. शरीर आणि मन एकसंघ वाढते. शरीर विज्ञानाच्या आधारे चेतासंस्थेचे सुदृढीकरण आवश्यक आहे हे समजते. मानसिक क्रिया सतत चालू असते आणि त्यासाठी ही उर्जा वापरली जाते. ही उर्जा अन्नापासून मिळत असल्याने अन्न घटक, त्याचे कार्य, परिणाम जाणून घ्यावे लागतात. मेंदूला पण विश्रामाची आवश्यकता असते. खेळ शिकविण्याचे उत्कृष्ट साधन आहे. त्यातून नैतिकता, सांघिपणा, सहकार्य, लोकशाही, स्पर्धात्मकता रुजते.

शिक्षकांच्या प्रशिक्षणात मानसशास्त्र खूप महत्वाचे आहे. विद्यार्थ्यांना समजून घेण्यासाठी खूप उपयुक्त आहे. मानसशास्त्रामुळे माणसाच्या स्वभावाचे (नेचर) आकलन होते. विद्यार्थ्यांचा कल ओळखता येतो, बुद्धिमापन करता येते व यशाचे मूल्यमापन करता येते. येथे संख्याशास्त्र माहिती असणे उपयोगी आहे. सामाजिक शास्त्रे महत्त्वाची आहेत. शिक्षण भूतकाळातील उपयोगी गोष्टी चालू ठेवते, वर्तमानाचे जतन करते व माणसाची प्रगति करीत रहाते. या सगळ्यात शिक्षक महत्वाचे आहेत. त्यांचे अधिक चांगल्या प्रकारे प्रशिक्षण होण्याची आवश्यकता आहे. तर्कशास्त्र उपयोगी आहे. त्यामुळे बऱ्याच गोष्टींचा अंदाज लावता येतो.

एकंदरीत शिक्षणाचा विचार करताना शिक्षणाची ध्येये निश्चित करावी लागतात. त्यामुळे ठराविक कालावधी नंतर त्या दिशेची वाटचाल अभ्यासता येते. मूल्यमापन करुन अधिक लक्ष किंवा तरतूद करता येते. उदा. शिक्षणाने उपजिविका मिळविण्याची क्षमता असलेले लोक निर्माण झाले पाहिजेत. त्यामुळे राज्यास इतर खर्चा साठी पैसा उपलब्ध होईल.

शिवाय सर्व हातांना, बुद्धिला योग्य काम मिळणे आवश्यक आहे. यावरुन शिक्षणाचा किती अधिक विस्तार पाहिजे हे सहज लक्षात येते. परंतू नोकरी साठी शिक्षण हे अपूरे राहील. नैतिक असणे, आई, वडिल व समाजातील दुर्बल घटक इ. यांची काळजी घेणे, सुजाण नागरिक असणे आवश्यक आहे. आणखी आंतर राष्ट्रीय संबंधाचा इतिहास माहित पाहिजे व बदलत्या परिस्थितीचा अंदाज करता आला पाहिजे. अहिंसेचे तत्वज्ञानान आत्मसात केले पाहिजे.

ज्ञानाचा विस्तार लक्षात घेतला पाहिजे.आज अंतराळ संशोधन, दुर्मिळ धातू (रेअर अर्थ मेटल), उर्जा इ. क्षेत्रात इतर अनेक देशांची प्रगति अधिक आहे. संशोधन न केल्यास फायदे मिळणे अवघड होते.

जीवनात कला नसेल तर जीवन नीरस होईल. शिक्षणाने आपले ज्ञान क्षेत्र, अनुभव क्षेत्र विस्तारते. शिक्षणासाठी वयाची अट नसते. देश, विदेश साहित्य सहज उपलब्ध आहे. त्यामुळे आपली निवड करणे महत्वाचे ठरते. थोडक्यात शिक्षण माणसात आमूलाग्र बदल करते. आपल्या भोवतालच्या सामाजिक परिस्थितीतून कर्तृत्वाकडे नेते. परस्पर संबंध दृढ करते.


# पिंपळे सौदागर येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस उत्साहात

**ज्योतिर्मय साहित्य**

पिंपळे सौदागर – पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आपला देश अधिकाधिक बलवान होत चालला आहे. पुढील काळातही त्यांच्या मार्गदर्शनाखाली आपल्या देशाची प्रगती वाढत जाणार असल्याचे प्रतिपादन पिंपरी चिंचवड महानगरपालिका विधी समितीच्या सदस्या तसेच नगरसेविका डॉ. कुंदाताई भिसे यांनी केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त पिंपळे



सौदागर येथील उन्नती सोशल फाउंडेशनच्यावतीने आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. गुरुवार दि. १७ रोजी सकाळी फाउंडेशनच्या प्रांगणात उपस्थित नागरिकांच्या उत्साहपूर्ण प्रतिसादात झालेल्या या कार्यक्रमात प्रारंभी परिसरातील सफाई कामगारांच्या हस्ते श्री गणेशाची आरती करण्यात आली. सामाजिक समरसतेच्या बांधिलकीतून सेवा संकल्प अभियानांतर्गत हा उपक्रम घेण्यात आला. श्री गणेशाच्या आरतीनंतर ७६ दिवे उजळून नरेंद्र मोदी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते सागर बिरारी यांनी १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या दरम्यान आयोजित सेवा संकल्प अभियानाची माहिती दिली. उन्नती सखी मंचच्या उपाध्यक्षा डॉ. रश्मी मोरे तसेच ज्येष्ठ नागरिक प्रा. प्रेमलाल लांजेवार यांनी आपले मनोगत यावेळी व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उन्नती सोशल फाउंडेशनचे संस्थापक संजय भिसे यांनी केले. श्री गणेशाच्या प्रसाद वाटपाने कार्यक्रमाची सांगता झाली.




# जात्यावरच्या ओव्या......

अरे बरस पावसा
तुला शप्पथ गळ्याची
जप लाज मातीची
मह्या मोत्या -पवळ्याची ||८५०||

बैलपोळ्याचा सण
पुरणपोळी चा मान
आलं आनंदा उधाण
मोत्या पवळ्याच औक्षण ||८५१||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ७४




ज्योतिर्मय साहित्य

**बहुतांपरी संकटे साधनाची ।**
**व्रते दान उद्यापने ते धनाची ।**
**दिनाचा दयाळू मनी आठवावा ।**
**प्रभाते मनी राम चिंतीत जावा ।। ७४।।**

अर्थ : परमेश्वर प्राप्तीच्या साधनांमध्ये अनेक प्रकारच्या अडचणी येतात. व्रते, दानधर्म, उद्यापन करणे या गोष्टींसाठी गाठीशी पैसा लागतो. परंतु दिनांसाठी दयाळू असणाऱ्या भगवंताला आठवण्यासाठी यापैकी कशाची जरुरी नाही. म्हणून अशा या भगवंताचे पहाटेच्या सुमारास चिंतन करावे.

( बहुतांपरी - अनेक प्रकारचे, साधनांची - ईश्वर प्राप्तीच्या विविध मार्गांची, उद्यापन - एखाद्या व्रताच्या अखेरीस केलेला धार्मिक विधी )



विवेचन : ईश्वरप्राप्तीचे अनेकविध मार्ग आहेत. त्यासाठी कोणी व्रतवैकल्ये करतो, कोणी एखादे अनुष्ठान करतो, तर कोणी दानधर्माचा मार्ग अनुसरतो. आपण कोणता मार्ग निवडायचा याचे स्वातंत्र्य अर्थातच साधकाला असते. तरी समर्थ या मार्गातील धोके आणि अडचणी आपल्या निर्दशनास आणून देतात. या सगळ्या गोष्टींसाठी धनाची जरुरी असते. व्रत करायचे म्हटले तर काही तरी नियम आलाच. त्यानुसार शरीराला पडणारे कष्टही आले. शिवाय व्रताचे काही नियम असतात. त्यांचे व्यवस्थित पालन झाले पाहिजे. व्रत व्यवस्थित पूर्ण झाल्यानंतर त्याची विधिपूर्वक सांगता करावी लागते. त्यासाठी पुरोहितांना बोलावून धार्मिक विधी, दानधर्म, दक्षिणा आदी गोष्टी कराव्या लागतात.

व्रत, दानधर्म आणि उद्यापने या गोष्टी करायच्या तर पैशाची व्यवस्था आधी करावी लागते. बरे, या सगळ्या गोष्टी म्हणजे परमेश्वर प्राप्तीसाठीचे बाह्य मार्ग झाले. हे सगळे करीत असताना माणूस यातच गुंतून पडतो. परमेश्वर प्राप्तीसाठी अंतर्मुख होण्याची आवश्यकता असते. तो आपल्या अंतर्यामीच वसलेला असतो. सगळे लोक व्रतवैकल्ये, उद्यापन सोहळे,दानधर्म आदी गोष्टी समारंभपूर्वक करतात म्हणून आपल्यालाही असे करायलाच हवे नाहीतर लोक काय म्हणतील अशी भीती सामान्य माणसाच्या मनात असते. बऱ्याच वेळा मग इतरांना दाखवण्यासाठी देखील असे विधी मोठे समारंभपूर्वक करावे लागतात. यात आर्थिक आणि मानसिक कुतरओढ होते ती सर्वसामान्य माणसाची. त्याचा गोंधळ होतो. नेमके काय करावे ते कळत नाही. सगळी सोंगे आणता येतात पण पैशाचे सोंग आणता येत नाही. पण परमेश्वर यापैकी कुठल्याच गोष्टीची अपेक्षा तुमच्याकडून करत नाही.

(क्रमशः)




## ॥ संजय उवाच... ॥




@संजय काव्या पुणे 7743918859

✍️ चढाओढ

चढाओढ नेहमी प्रगतीसाठी करावी कुणावर कुरघोडी करण्यासाठी नको, तुमच्या यशाचा सर्वांना अभिमान वाटावा असे काम करा, व दुसऱ्यांच्या यशात आनंदाने सहभागी व्हा हेच शहाणपणाचे लक्षण आहे.

(हे माझे मत आहे पटले तर घ्यावे)

# नामाचे सूक्ष्म स्वरूप



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

नुसते 'राम राम' म्हणून राम कसा भेटेल हा प्रश्न माणूस सहजच विचारतो, आणि त्याला दाखला म्हणून म्हणतो की, समजा एखादा मनुष्य 'नोकरी नोकरी' असा जप करीत खोलीत बसला, तर त्याला नोकरी मिळणे शक्य आहे का ? वरकरणी हा दाखला अगदी बेमालूम दिसतो खरा, पण थोडासा विचार केला, तर तो इथे मुळीच लागू पडत नाही, असे कळून येईल. जो दाखला द्यायचा, आणि ज्या बाबतीत तो द्यायचा, त्यांचे गुणधर्म सारखे असावे लागतात. 'रामनाम' आणि 'नोकरी' यांचे परिणाम एकमेकांविरूद्ध आहेत. 'राम राम' म्हणण्याचा शेवट रामप्राप्तीत म्हणजे स्वतःच्या विस्मरणात होत असतो; म्हणजे देहबुद्धीतून देहाच्या पलीकडे जाणे, म्हणजे स्थूलांतून सूक्ष्माच्या पलीकडे जाणे, हा 'राम राम' म्हणण्याचा परिणाम. परंतु नोकरीचा प्रकार याच्या अगदी विरुद्ध आहे. मुळात नोकरी ही कल्पना सूक्ष्म आहे. नंतर, ती मिळावी म्हणून दहाजणांचे आर्जव करायचे, त्याच्यानंतर ती देणारा भेटायचा, आणि मग आपण ती नोकरी करायची. म्हणजे नोकरी या कल्पनेतून, सूक्ष्मातून, स्थूलात जाणे हा नोकरीचा प्रकार. पण ' राम राम ' म्हणणे हा प्रकार स्थूलांतून सूक्ष्माच्याही पलीकडे जाण्याचा आहे. यावरून, नोकरीचा हा दाखला इथे लागू पडत नाही हे स्पष्ट होते. दुसरी गोष्ट म्हणजे 'नोकरी नोकरी' असा जप करून नोकरी मिळणे कठीण हे तर खरेच, पण 'राम राम' म्हणून राम मिळणे कसे सोपे, किंबहुना कसे हमखास शक्य आहे हे पहा. नोकरी म्हणजे मुळात कल्पना असून, ती प्रत्यक्षात आणण्याकरिता इतर अनेक गोष्टींची कशी जुळवाजुळव करावी लागते, हे आपण आत्ताच पाहिले. तसेच, घर बांधणे ही कल्पना; ती पुरी करून ते घर सर्व बाजूंनी सुखसोयीचे आगर व्हावे या हेतूने सर्व जिनसा पैदा करून त्यात आणून ठेवणे, म्हणजेच कल्पनेतून कृतीत येण्याचा प्रकार झाला. आता हे करणे किती कष्टाचे आणि अनिश्चीत आहे याचा अनुभव सर्वांना आहे. 'राम राम' म्हणण्याचे उद्दिष्ट, स्थूलांतून सूक्ष्माच्या पलीकडे जाणे हे आहे; म्हणजेच, अगदी सर्व बाजूंनी परिपूर्ण आणि भरलेले घर एकेक वस्तू फेकून देऊन रिकामे करण्यासारखे आहे. ही गोष्ट करण्याची इच्छा असल्यास कोणालाही सहज होण्यासारखी आहे. तेव्हा 'नोकरी नोकरी' म्हणून नोकरी मिळणे जितके कठीण, तितकेच 'राम राम' म्हणून राम मिळणे निश्चीत आहे. सबब 'राम राम' म्हणून राम कसा भेटेल अशी शंका न घेता' राम राम' जपावे.

मनाच्या सर्व दुःखाला कारण देहबुद्धी आहे. ती जायला उपाय एकचः प्रेमाने भगवंताचे नामस्मरण करावे. त्याच्या योगाने सर्व मल जाईल. नामस्मरणच रामाची गाठ घालून देईल. चित्तात तशी तळमळ मात्र पाहिजे. 'मी' पणा टाकावा आणि परमात्म्याचे होऊन राहावे.

जो नाम घेतो त्याला देहाच्या सुखदुःखाची जाणीव राहणार नाही. तो आनंदात राहील.

***

# || अध्यात्म ||

मधुकर बोरीकर,
पुणे

## आपले सण आपले उत्सव
## महालक्ष्मी/ गौरी

कथानक

महालक्ष्मी किंवा ज्येष्ठा गौरी व्रताचा उल्लेख देवी भागवत या ग्रंथात आला आहे. सत्यवान व सावित्री यांच्या कथे दरम्यान या व्रताचा उल्लेख येतो. सत्यवानाचे आयुष्य विवाहानंतर फक्त एक वर्षाचे उरलेले असते. त्याची पत्नी सावित्री ही, थोर प्रतिव्रता व परमेश्वराची अनन्य भक्त असते. ती आपल्या पतीचे आयुष्य आता संपत आले आहे म्हणून त्याची डोळ्यात तेल घालून काळजी घेत असते. जो मृत्युचा दिवस नारद मुनींनी सांगितलेला असतो त्या दिवशी सावित्री आपल्या पती सोबतच वनात जाते. सत्यवान झाडा वर चढुन लाकडे तोडत असताना तो भोवळ येऊन खाली पडतो,व त्याचे प्राण जातात. सावित्री तिच्या दिव्य दृष्टीने पाहु शकते की, सत्यवानाचे प्राण नेण्यासाठी प्रत्यक्ष यम धर्मराज तिथे आलेले आहेत. ती ही यमा सोबत, त्यांनी प्राण हरण केल्यानंतर, चालायला लागते. ते तिला सोबत येऊ नको असे म्हणतात. त्यात चतुर पणे ती यमधर्म राजास सांगते की, मी आपल्या सोबत येत नाही, मी माझ्या पतीसोबत चालत आहे. पती सोबत जाणे हे पतिव्रतेचे कार्य आहे त्यामुळे मी त्याचे सोबत जात आहे. यम धर्मराज तिला दोन वर देतात. (क्रमशः)




## काहीतरी देणे हिच खरी मानवता

मित्रांनो आणि वाचकहो, आपणा सर्व भारतीयामधे "काहीतरी देणे"हे एक पुण्य कर्म मानले जाते. पुराणग्रंथ किंवा गीतेतून सुध्दा 'दानधर्म 'याला महत्व दिले आहे.आज विभक्त कुटुंब होत असलेतरी तो काल आठवून पहा, ज्यावेळी पाच भाऊबहिणी व त्यांचे मुलेमुली असे 20/25 जणांचे कुटुंब एकत्र राहात, जीवन जगत, खाणेपिणे, सहकार्याने काम करणे, ही संस्कृती होती. आणि तेव्हा अर्धा कप चहा देण्यापासून ते सर्व गोष्टीत देणेघेणे चालत असे. काय बरोबर ना.खर तर आज आपण सार्वजनिक-तांत्रिक आणि घरादारानी जरी समृद्ध झालो, पण देणे हा माणूस व माणूसकीचा पाया आहे, जीवनाचा जल्लोष आहे, ती मानवप्राण्याची एक शैली आहे.. असे वाटते! अगदी बसमधे सरकून जागा देण्यापासून ते त्यातील अर्धीतली अर्धी भाकरी देणे हा भारतीयाचा वेगळेपणा आहे. यासाठी पैसा किंवा वेळ देणेच गरजेचे नाही, तर रस्त्यावर चालतांना दिलेले एक हास्य, एक वाक्य, एक प्रेमळ शब्द किंवा अगदी हायहॅलो ठिक ना.हेसुध्या. "तुम्ही कसे आहात?" हे शब्दसुध्दा मोठे काम करतात. आज असे अनेक ऊदा. आहेत की, काही माणसं असे अनेक वर्षे गुपचुप, प्रसिद्धी न करता काम करतात. काही गृप, काही संस्था, काहीगट काही समाजसेवक "काहीतरी देणे" यासाठी विनामूल्य काम करतात. खरतर मित्रांनो, असे कार्य "कोणत्याही रूपात, कोठेही कुणाकडूनही होऊ शकते! असो आज एवढे देणे संपवितो आणि मीही थांबतो. आवडले तर लाईक शेअर करा आणि वाचत राहा सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे. सुप्रभात.

# प्रभातपुष्प

षटकोळी माझी

संध्याराणी जयहिंद कोल्हे {काव्यसंध्या}
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

### क्षण आनंदाचा

क्षण आनंदाचा सदैव
मनोमनी या जपता
एकांतात तो आठवावा
हास्य फुलता ओठी
मन समाधान पावते
जन्म सार्थकी व्हावा

खूप दिवसांच्या भेटीने
सुख खरे लाभते
तोचि क्षण आनंदाचा
गळा भेट होता
आठवणींना मिळे उजाळा
हात हाती आधाराचा



# जेवणानंतर कोथिंबीर चावून खाल्ल्याने पचन सुधारते

ज्योतिर्मय साहित्य

मेथी : मेथी हे मधुमेहींना वरदान आहेच. चवीच्या दृष्टीने पालेभाज्यांत मेथीचे महत्त्व फार मोठे आहे. मधुमेहाच्या प्राथमिक अवस्थेत मेथीची भाजी नियमित खाल्ली तर मेथीपूड मिसळून गव्हाची पोळी खाण्याची पाळी येत नाही. मेथीची पालेभाजी खाल्ल्यामुळे लघवीचा वर्ण सुधारतो. भूक सुधारते, पाचक स्राव वाढतात. बाह्योपचार म्हणून मेथी पालेभाजीचा लेप दुखणाऱ्या सांध्यावर करावा. दुःख कमी होते. केस गळणे, कोंडा, केस निर्जीव होणे याकरिता मेथीच्या रसाने केस धुवावे.

राजगिरा : राजगिरा बियांचा वापर आहेच. राजगिरा पालेभाजी रक्तशुद्धीकरिता फार उपयुक्त आहे. गंडमाळा, क्षय, लघवीची जळजळ या विकारांत पालेभाजी किंवा त्या पानांचा वाटून लेप करावा. शरीरस्वास्थाकरिता लागणारी द्रव्ये राजगिरा पाने व बिया या दोन्हीही आहेत.

शतावरी : शतावरी पाने अगदी बारीक असतात. लहान मुलांच्या जुलाब, पित्त होणे, दातांचा त्रास या विकारांत रस द्यावा. पाने पौष्टिक आहेत. कंदातील स्तन्यजनन हे गुण पानात अल्प प्रमाणात आहेत. कुंडीत शतावरी शोभेकरिता लावतात. त्यातील पानांचा ताजा रस ताकद कमावण्याकरिता उपयुक्त आहे. गोवर, कांजिण्या, जीर्णज्वर, कडकी या विकारांत ही पालेभाजी पथ्यकर आहे.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

शेपू : उग्र वासामुळे शेपूचा वापर कमी होतो. शेपूची पालेभाजी वात व कफविकारात फार चांगली. पाने स्वच्छ धुऊन घेतली की उग्र वास कमी होतो. अग्निमांद्य, पोटफुगी, गॅस, कुपचन या विकारांत लगेच गुण देणारी ही पालेभाजी आहे. सोबत जिरे, आले किंवा लसूण वापरावा. लहान मुलांच्या पोटदुखी, जंत, कृमी या तक्रारीवर एकवेळी दिलेली भाजी काम करते. ज्या स्त्रियांना मासिक स्राव व्यवस्थित येत नसल्यास त्यांनी काही दिवस शेपूची पालेभाजी खावी. विटाळ नियमित होतो. गळवे पिकण्याकरिता पानांचा लेप करावा. गंडमाळा विकारात पोटात घेण्याकरिता व बाहेरून पानांचा लेप अशा दोन्हीकरिता शेपूच्या पानांचा वापर करावा.

हादगा

हादग्याची फुले पांढरी किंवा जांभळ्या रंगाची असतात. चणापीठ पेरून हादग्याच्या फुलांची कोरडी भाजी फार चविष्ट होते. पूर्वी मिळणाऱ्या अनेक भाज्या अलीकडे दिसेनाशा झाल्या आहेत. हादग्याला आगस्ता असे संस्कृत नाव आहे. आयुर्वेदीय औषधीकरणात मनशीळ शुद्धीकरिता हादग्याच्या पानांच्या रसाचा वापर सांगितला आहे. ठेचाळलेल्या भागावर किंवा जखमेवर पाने ठेचून बांधावी. जखम भरून येते.

****




# ४५ फुटी झाडातून प्रगटला ४१ फुटी ‘‘भव्य इको ग्रीन गणेशा‘‘

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर : सामाजिक भान आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत दरवर्षी नावीन्यपूर्ण उपक्रम राबवणाऱ्या ‘कुलस्वामिनी प्रतिष्ठान’ च्या वतीने यंदा गणेशोत्सवाचे १७ वे वर्ष अत्यंत उत्साहात साजरे केले जात आहे.

या पुर्वी गणेश मंडळ मार्फत २१ फुटी भारत गणेश, १२० फुटी शेत तळ्यातील तरंगता गणेश, दोन एकर वर पेरून महा ग्रीन गणेश, ७० फुटी चांद्रयान, ६० फुटी झुल्यावरचा गणेश इत्यादी इको भव्य देखावे केले आहेत. आत्तापर्यंत जिल्हास्तरीय तसेच राज्यस्तरवर या मंडळास अनेक पारितोषिके प्राप्त झाली आहेत.

यंदा प्रतिष्ठानच्या वतीने निसर्गाचे महत्त्व पटवून देणारा ४५ फुटी उंच झाडातून प्रगटलेला ४१ फुटी ‘‘भव्य इको ग्रीन गणेशा‘‘ चा नयनरम्य देखावा साकारण्यात आला आहे. विशेष म्हणजे, अवघ्या २० हजार रुपयांच्या अत्यल्प खर्चात आणि पूर्णपणे टाकाऊ व पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करून हा भव्य देखावा उभारण्यात आला आहे. ४५ फुटी झाड, १२ फुट उंच गाय वासरू व ४० फुट लांब डोंगर आणि पाण्याचा जिवंत झरा असा हा भव्य देखावा सर्वांना खूप आकर्षित करीत आहे.

गेल्या तीन आठवड्यांपासून प्रतिष्ठानचे कार्यकर्ते या देखाव्यासाठी दिवस-रात्र मेहनत घेत आहेत. सुमारे ३०० बांबूंच्या कामट्यांचा वापर करून ४१ फुटी सोनेरी रंगाची आकर्षक ग्रीन गणेश मूर्ती, ४५ फुटी उंच झाडामध्ये विराजमान करण्यात आली आहे. यासोबतच २०० फुट बाय ५ फूटी टाकाऊ कारपेटचा वापर करून १२ फूट उंच व ४० फूट लांब डोंगर-दऱ्यांच्या रांगा तयार केल्या आहेत.

या डोंगरामधून वाहणारा पाण्याचा खळाळता झरा खालील १० फुटी कृत्रिम शेततळ्यात साचताना दिसतो, जो उपस्थितांचे लक्ष वेधून घेईल.

देखाव्यातील मुख्य आकर्षणे आणि सामाजिक संदेश : झाड वाचवा संदेश : ५ फुटी बाल-गणेश २५ फुट वृक्षाला आलिंगन देत वृक्षसंवर्धनाचा संदेश देत आहे.

पृथ्वी रक्षण : कृत्रिम शेततळ्यात ४ फुटी बाल-गणेश पृथ्वी सोबत निसर्गाचे रक्षण करण्याचे आवाहन करत आहे.

प्राणिमात्र दया : निसर्गाचा समतोल राखण्यासाठी १२ फुटी उंच गाय आणि वासरू तसेच पाण्यातील कासव, हरीण, बगळा, मोर इ. प्राणी-पक्षी यांची मुर्ती उभारून मुक्या प्राण्यांवर प्रेम करण्याचा संदेश देण्यात आला आहे.

इको-फ्रेंडली विसर्जन: या गणेशोत्सवात शाडूच्या मूर्तींचाच वापर करावा आणि मूर्तींचे विसर्जन कृत्रिम हौदांमध्येच करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. मंडळाची शाडू मूर्तीही याच कृत्रिम तळ्यात विसर्जित केली जाणार आहे. वापरलेले टाकाऊ व पर्यावरणपूरक वापरलेले साहित्य - ४ ते ६ फुटी ३०० बांबू कामट्या, ५० किलो काथ्या रस्सी, ५० लाकडी बल्ली, २००५ फूट टाकाऊ कारपेट, ३ बॅग सिमेंट आणि १५ लिटर नैसर्गिक रंग.

यांचे लाभले योगदान : या देखाव्याची संकल्पना कुलस्वामिनी प्रतिष्ठानचे अध्यक्ष विलास कोरडे यांची असून, देखावा निर्मितीसाठी अध्यक्ष विलास कोरडे, कार्याध्यक्ष अविराज कोरडे, सौ. अलका कोरडे, संजय राठोड, सौ. लता अनिल गावंडे, सौ. सविता अच्युत कुलकर्णी, प्रल्हाद गायकवाड, ज्ञानेश्वर सागरे, नथुराम नरवाडे, सचिन जोहरे व मजहर मंडीवाला यांनी सलग तीन आठवडे विशेष परिश्रम घेतले आहेत.

‘‘झाडे लावा-झाडे जगवा, वसुंधरा साठी पर्यावरण जतन, प्लास्टिक व थर्माकोल टाळा आणि आपले शहर स्वच्छ व सुंदर ठेवा,‘‘ असा महत्त्वपूर्ण संदेश देणाऱ्या या भव्य इको-फ्रेंडली गणेशाच्या दर्शनासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन कुलस्वामिनी प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

देखाव्यास भेट देणाऱ्या भक्ताकडून प्रत्येक वर्षी पाच झाडे लावुन संगोपन करणे, पर्यावरण संवर्धनासाठी प्लास्टिक, थर्माकोल वापर न करणे, समाजकार्य व माणुसकीने जपणे अशी प्रतिज्ञा लेखी घेण्यात येत आहे.

गेली पंधरा वर्षापासून भव्य इको देखावा करणारे एकमेव कुलस्वामिनी गणेश मंडळ आहे. हा देखावा पाहण्यासाठी व बाप्पाचा आशीर्वाद घेण्यासाठी सर्वांनी यावे असे आवाहन श्री कोरडे परिवारानी केले आहे.

# लोकजागृतीचे साधक व राष्ट्रीय एकतेचे प्रतीक : ''गणेशोत्सव''

**ज्योतिर्मय साहित्य**

आपला भारत देश विविधतेने नटला आहे. भारतात अनेक जाती धर्माचे लोक सर्वधर्मसमभावाने, गुण्यागोविंदाने राहतात. भारतात अनेक सणवार, उत्सव मोठ्या आनंदाने साजरे केले जातात. त्यातील एक महत्वपूर्ण सण वा उत्सव म्हणजे ''गणेशोत्सव''. गणेशोत्सव संपूर्ण भारतात मोठ्या आनंदाने, उत्साहाने, विश्वासाने, भक्तिभावाने, श्रद्धेने साजरा केला जातो. संतांची भूमी म्हणून ओळखला जाणारा आपला महाराष्ट्र. संतांच्या चांगल्या विचारांनी, पावन पदकमलांनी पावन झालेली आपल्या महाराष्ट्राची पावन भूमी. आपल्या महाराष्ट्राच्या पावन भू वर गणेशोत्सव पवित्र भावनेने साजरा करतात.



गणेश चतुर्थी ही भाद्रपद महिन्यात शुक्ल पक्षात येते. आणि १० दिवसानंतर अनंत चतुर्दशीला संपते. १० दिवसांचा हा सण, उत्सव मोठ्या थाटामाटात चालतो. बुद्धी, समृद्धी, संकटनाशक, संकट निवारण, सुखकर्ता, दुःखहर्ता, सुखा:चा दाता, दु:ख, संकटं दूर करणारे आपले आवडते दैवत श्री गणरायांना, लाडक्या गणपती बाप्पाला हा उत्सव समर्पित आहे. या १० दिवसाच्या गणेशोत्सवाच्या काळात गणपती मूर्तीची स्थापना, विविध धार्मिक, सामाजिक कार्यक्रम, भजन, कीर्तन, व्याख्याने, स्वच्छता अभियान, रक्तदान, सेवादान, अन्नदान, मोफत आरोग्य तपासणी शिबीरे, गोर-गरीब, गरजवंतांना आवश्यक वस्तू वाटप केले जातात. अशा प्रकारचे विविध कार्यक्रम घेतले जातात.

**गणेशोत्सवाची सुरुवात :**

महाराष्ट्रात पेशव्यांच्या काळात गणेशोत्सवाची सुरुवात झाली. आणि पुढे १८९३ साली राष्ट्रीय एकात्मतेसाठी व जनहितार्थतेसाठी स्वातंत्र्यसैनिक लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवाला समता, समानता, बंधुत्वाचे व राष्ट्रीय एकतेचे सार्वजनिक रूप देत गणेशोत्सवाची मुहूर्तमेढ रोवली. तसेच आपल्या बांधवांना संघटित करून राष्ट्रीय अस्मिता व राष्ट्र प्रेमभावना जागृत करावी व देशाभिमान जागृत व्हावा. या उद्देशाने गणेशोत्सवाची सुरुवात केली. गणेशोत्सवामुळे सामाजिक, धार्मिक निती मूल्ये जोपासता आली. त्या काळात गणेशोत्सवामुळे समाजातील ऐक्य, सलोखा टिकून राहण्यास मदत झाली. व लोक एकजूटतेने राहू लागले. समाजातील सर्व स्तरातील लोक एकत्र येऊन गणेशोत्सव साजरा करू लागले.

**समाजात सलोखा व ऐक्याची भावना :**

आपण ज्या समाजात राहतो त्या समाजाचे आपण कांही देणे लागतो. आणि ते देणे म्हणजे एकमेकांप्रति आदर, सम्मान, प्रेम भावना, आपुलकी, आपलेपणा, जातीय सलोखा. समाजातील परस्परातील मतभेद, द्वेष, मत्सर, ईर्षा या विद्रोही भावना किंवा तिरस्कार निर्माण करणाऱ्या गोष्टी समूळ नष्ट करण्यासाठी गणेशोत्सव हा सलोखा राखणारा ऐक्याचा सण आपला वारसा बांधिलकीने आजतागायत आतापर्यंत जपून आहे. लोकजागृतीचे माध्यम म्हणजेच गणेशोत्सव. लोकांमध्ये देश प्रेम भावना, ऐकतेची सदभावना जागृत करून एकमेकांना सलोखा राखत जवळ आणणे. गणेशोत्सव हा केवळ एक सण किंवा उत्सव नाही. हा सलोखा व एकतेचा उत्सव आहे.

**सामाजिक ऐकतेचे प्रतीक गणेशोत्सव :**

समाजातील सर्व जातीधर्मातील लोक एकत्र येऊन गणेशोत्सव साजरा करतानाचे चित्र आज समाजाला ऐकतेचा संदेश देत आहे. यामुळे समाजात ऐक्याची व बांधिलकीची भावना वाढीस लागली आहे. दरवर्षी गणेशोत्सवात मुस्लिम बांधव मोठ्या उत्साहाने सामील होत आहेत. ढोल ताशांच्या गजरात, भव्य दिव्य मिरवणूका काढत मिरवणूकिंमध्ये सर्व जाती धर्माचे लोक (भक्तगण) भान विसरून गणरायांच्या भक्तीरसात तल्लीन होऊन एकमेकांवर गुलाल उधळीत लाडक्या बाप्पाचे स्वागत करतात. आणि समाजाला बंधुत्वाचे महत्व पटवून देण्यास साहाय्य करतात.

✍ सौ. मनीषा सोन्नेकर/सोनकांबळे
देगलूर. 9960028899



भारतीय सणवार, उत्सव हे असेच आहेत. जे की सर्व जाती धर्मातील लोकांना एकमेकांच्या उत्सवात सामील करून घेत राष्ट्रीय ऐकतेचा संदेश देतात आणि ''राष्ट्रीय एकात्मतेचा'' संदेश देऊन बंधुभाव निर्माण करतात. आपल्या उत्सवात सर्व जातीधर्मातील लोकांना सामील करून घेणारा उत्सव म्हणजे ''गणेशोत्सव''.

गणेश चतुर्थीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा... गणपती बाप्पा मोरया...!

# निसर्गकवी ना. धो. महानोर!

**ज्योतिर्मय साहित्य**

मराठी साहित्यातील अनमोल रत्न, निसर्गकवी ना. धो. महानोर यांची आज जयंती. निसर्गकवी ना. धो. महानोर यांचा जन्म १६ सप्टेंबर १९४२ रोजी पळसखेडे येथे एका गरीब शेतकरी कुटुंबात झाला. त्यांचे आई-वडील शेतमजूर होते. दुसऱ्याच्या शेतात जाऊन ते राबत असत. ना. धो. महानोरांना चार भाऊ व तीन बहिणी होत्या. त्यात ते सर्वांत थोरले होते.

त्यांचे प्राथमिक शिक्षण गावातच झाले; मात्र माध्यमिक शिक्षण घेण्यासाठी त्यांना शेंदुर्णीच्या शाळेत जावे लागले. शेंदुर्णीची शाळा गावापासून दहा-बारा किलोमीटर अंतरावर होती. दहा-बारा किलोमीटर पायी चालत जाऊन ते शाळेत जात. शाळेत असतानाच त्यांना कवितेची गोडी लागली. शाळेत असतानाच ते कविता करू लागले.

लहानपणापासूनच त्यांना शेत, शिवार आणि निसर्ग यांची आवड होती. त्यामुळे ते त्यावरच कविता करत. लहानपणी लागलेली कवितेची गोडी पुढेही कायम राहिली.

मॅट्रिक पास झाल्यावर ते जळगावला उच्च शिक्षण घेण्यासाठी गेले. तिथे त्यांनी मुळजी जेठा महाविद्यालयात कला शाखेत प्रवेश घेतला. तिथे त्यांची काव्यप्रतिभा बहरली. त्यांच्यात असलेली काव्यप्रतिभा ओळखून महाविद्यालयातील शिक्षकांनी त्यांना प्रोत्साहन दिले. दुर्दैवाने घरची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने त्यांना उच्च शिक्षण अर्ध्यावर सोडून घरी परतावे लागले. घरी आल्यावर ते शेतीत रमले. शेतशिवारात राबतच त्यांनी आपल्या कविता करायला सुरुवात केली. शिक्षण थांबले, पण कविता थांबली नाही.

ते शेतशिवारात रमून कविता करू लागले. शेतशिवारात रमणाऱ्या या कवीने आपल्या कवितेतून निसर्गाची अमाप उधळण केली. त्यांच्या अद्भुत निसर्गकवितांनी त्यातल्या रंग-गंधांनी, नदीच्या प्रवाहासारख्या नाद-लयींनी वाचक-रसिकांना वेड लावले. रानात

श्याम ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे

राहणाऱ्या ना. धो. महानोर सरांच्या कवितेचे केंद्रस्थान निसर्ग आणि स्त्रिया होते. निसर्ग आणि स्त्रियांना केंद्रस्थानी ठेवून त्यांनी केलेल्या कविता वाचकांच्या मनावर कायमच्या कोरल्या गेल्या.

त्यांचे एकूण अकरा काव्यसंग्रह प्रसिद्ध असून 'अजिंठा' नावाचे खंडकाव्यही प्रकाशित झाले आहे. यादरम्यान त्यांनी गद्यलेखनही सुरू ठेवले. 'गांधारी' ही कादंबरी, 'गपसप' व 'गावाकडच्या गोष्टी' हे लोककथासंग्रह, 'यशवंतराव चव्हाण यांचे मौलिक विचार', 'शरद पवार आणि मी', 'आनंदयोगी पु. ल.' ही पुस्तके त्यांनी लिहिली. त्यांनी जरी गद्यलेखन विपुल प्रमाणात केले असले, तरी त्यांचे पहिले प्रेम कवितेवरच होते.

त्यांनी अनेक चित्रपटांची गाणीही लिहिली आहेत. 'जैत रे जैत' चित्रपटातील त्यांची गाणी तर रसिकांच्या ओठांवर आजही कायम आहेत. ना. धो. महानोर सर सहा वर्षे विधानपरिषदेचे सदस्य होते. या काळात त्यांनी सभागृहात शेती आणि ग्रामीण भागातील प्रश्न पोटतिडकीने मांडले आणि ते सोडवण्याचा प्रयत्न केला.

महानोर सरांना अनेक पुरस्कार मिळाले. अगदी पद्मश्रीदेखील मिळाली; मात्र 'निसर्गकवी' ही रसिकांनी, वाचकांनी त्यांना दिलेली उपाधी ते सर्व पुरस्कारांपेक्षा श्रेष्ठ मानत. ३ ऑगस्ट २०२३ रोजी निसर्गात रमणारा हा निसर्गकवी सर्वांना सोडून गेला. ना. धो. महानोर सर जरी कायमचे निघून गेले असले, तरी रसिकांच्या आणि वाचकांच्या मनात ते कायम निसर्गकवी म्हणूनच स्मरणात राहतील. त्यांच्या निधनाने मराठी साहित्याची मोठी हानी झाली आहे. निसर्गकवी ना. धो. महानोर यांनी आपल्या कवितेतून मराठी साहित्याला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले आहे.

निसर्गकवी ना. धो. महानोर यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!




सांगता येत नाही आणि सहनही होत नाही.....



तुमचे प्रॉब्लेम लपवून ठेवू नका त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घ्या फोनवर आणि घरीबसून औषधी मिळवा.
■ ऑनलाईन औषधोपचार : आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज,
गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे.
सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

Dr Shaikh A H - 98606 99906

# प्रबोधनात्मक काव्य मैफिल प्रेरणादायी संकल्पना-डॉ मारोती गायकवाड

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर - शिव प्रतीक नगरी गणेश महोत्सव २०२६ खडी रोड,छत्रपती संभाजीनगर मध्ये यावेळी विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये दिनांक २१ सप्टेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता प्रबोधनात्मक काव्य मैफिलीचे बहारदार सादरीकरण होणार आहे. यामध्ये महाराष्ट्रातील प्रतिभावंत कवी, लेखक, निवेदक डॉ. सुशील सातपुते (लातूर), लेखिका, कवयित्री सौ. सुनिता गोविंद कपाळे, (छत्रपती संभाजीनगर), राज्यपाल पुरस्कार प्राप्त गुणवंत,कवी, लेखक, निवेदक, समीक्षक श्री. विजयकुमार रामराव पांचाळ (नांदेड), कवी लेखक समुपदेशक श्री. रोहीदास शिखरे



(छत्रपती संभाजीनगर), कवी, लेखक, निवेदक, व्याख्याते श्री. दिपक नागरे (वाशिम) अशा सुप्रसिद्ध कविच्या कवितेचे सादरीकरण होणार आहे. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिव प्रतीक नगरी गणेश महोत्सव २०२६ मंडळाचे अध्यक्ष डॉ. मारोती गायकवाड, श्री बालाजी पंदीरवाड (उपाध्यक्ष) , श्री धनराज गांगवे ( सचिव ) व आयोजन समिती यांनी उत्कृष्ट नियोजन केले आहे. मंडळाचे अध्यक्ष डॉ. मारोती गायकवाड यांनी प्रबोधनात्मक काव्य मैफिल ही एक प्रेरणादायी संकल्पना आहे, यामुळे या कवितेच्या मैफिलीचा आनंद घेण्यासाठी रसिक, गणेश भक्त नागरीक, यांनी मोठ्या संख्येने शिव प्रतीक नगरी, खडी रोड, संजिवनी हॉस्पीटल समोर बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर येथे उपस्थित रहावे असे आवाहन केले आहे.



## महावस्त्र नात्यांचं : महावस्त्राचे पदर...

विश्वास देशपांडे, चाळीसगाव, प्रतिक्रियेसाठी : ९४०३७४९९३२

### 'पती-पत्नी' (संसार रथाची दोन चाके)

'नटसम्राट' नाटकात मुले जेव्हा आई-वडिलांना घराबाहेर काढतात, तेव्हा अप्पा बेलवलकर आपल्या पत्नीची समजूत घालतात. तिला ते प्रेमाने 'सरकार' म्हणतात. त्या नाटकात दोघांनी शेवटच्या श्वासापर्यंत एकमेकांना दिलेली साथ पाहिली की पती-पत्नीच्या नात्याची अलौकिक ताकद लक्षात येते.

संसार तर सगळेच करतात; पण स्वातंत्र्यवीर सावरकर आणि त्यांच्या पत्नी माई यांनी पती-पत्नीच्या या नात्याला केवढ्या तरी उत्तुंग उंचीवर नेऊन ठेवले! नुकतेच लग्न झालेले असताना, माईंच्या डोळ्यांत सुखी संसाराची स्वप्ने तरळत असताना सावरकरांनी स्वतःला मातृभूमीच्या स्वातंत्र्यसंग्रामात झोकून दिले. सावरकरांना अंदमानच्या काळ्या पाण्याची जन्मठेप झाल्यानंतर माई जेव्हा त्यांना तुरुंगात भेटायला जातात, तेव्हा पतीला बेड्या घातलेल्या अवस्थेत पाहून त्यांचे डोळे पाणावतात. त्यावेळी त्यांची समजूत घालताना सावरकर म्हणतात–

"माई, काटक्या एकत्र करायच्या आणि घरटं बांधायचं, त्या घरट्यात पोराबाळांची वीण वाढवायची ह्यालाच जर संसार म्हणायचा असेल, तर असा संसार कावळे आणि चिमण्या देखील करतात! पण जर अवघ्या देशाचा संसार सुखी करण्यासाठी, आपल्या सुखी संसाराची होळी करून स्वतःला यज्ञकुंडात आहुती म्हणून द्यावं लागत असेल, तर तो खरा संसार आहे!"



## ॥ श्री गणेश चिंतन ॥

*समर्थ रामदास स्वामी कृपेने मनाचे श्लोक व दासबोधाच्या आधाराने "गणेश उत्सवात १० दिवस नियमित एक गणेश चिंतन करू या कारण "जो स्वतः शुभ झाला तोच शुभारंभ करू शकतो"*

कृतज्ञ मी कृतार्थ मी, भगवंत हृदयस्थ आहे 🙏 अपर्णा परांजपे कात्रज पुणे

### "समर्थांचे गणेशतत्त्व"

श्रीदासबोध – दशक १, समास २ : गणेशस्तवन
समर्थांची सुरुवातच विलक्षण आहे–
ॐ नमोजि गणनायका । सर्व सिद्धिफळदायका ।
अज्ञानभ्रांतिछेदका । बोधरूपा ॥१॥
हे गणनायका! सर्व सिद्धींचे फळ देणाऱ्या, अज्ञान आणि भ्रमाचा छेद करणाऱ्या, बोधस्वरूप गणेशा, तुला नमस्कार.
इथे गणेश = केवळ विघ्नहर्ता अशी समर्थांची भूमिका नाही.
तीन शब्द विशेष लक्षात घ्यावेत–
अज्ञान → भ्रांती → बोध
अज्ञानामुळे वस्तूचे यथार्थ ज्ञान होत नाही.
त्या अज्ञानातून भ्रांती निर्माण होते.
भ्रांती गेली की जे उरते ते बोध.
म्हणून समर्थ गणेशाला म्हणतात–
"अज्ञानभ्रांतिछेदका – बोधरूपा"
गणेश म्हणजे बोधस्वरूप चैतन्य.
ही गोष्ट अद्वैताच्या दृष्टीने अत्यंत सुंदर आहे. अज्ञानाचा नाश करण्यासाठी बाहेरून काही नवीन वस्तू आणायची नसते; जे आधीपासून आहे त्याचे आवरण दूर व्हायचे असते.
जसे सूर्य उगवून प्रकाश निर्माण करत नाही–तो आधीपासूनच असतो; ढग बाजूला झाले की प्रकाश प्रकटतो.
तसेच–आत्मज्ञान निर्माण होत नाही; अज्ञानाचे आवरण निवळते.
२. गणेशाला समर्थांची पहिली प्रार्थना
माझ्रिये अंतरीं भरावें ।
सर्वकाळ वास्तव्य करावें ।
मज वाक्शून्यास वदवावें ।
कृपाकटाक्षेंकरूनी ॥२॥
ही ओवी मला विशेष महत्त्वाची वाटते.
समर्थ म्हणतात–"माझ्या अंतःकरणात तू भरून राहा." बाहेरचा गणपती माझ्या अंतःकरणात येऊन बसावा एवढाच अर्थ नाही.
याचा अधिक सूक्ष्म अर्थ–माझी बुद्धी, माझी वाणी, माझे लेखन हे माझे राहू नये; त्यातून तुझा बोध व्यक्त व्हावा.
म्हणून पुढे "मज वाक्शून्यास वदवावें"
मी वाक्शून्य आहे, मला बोलण्याची पात्रता नाही.
तू कृपादृष्टी केलीस तर माझ्यातून ज्ञानाची वाणी प्रवाहित होईल.
हीच समर्थांची नम्रता आणि याच ठिकाणी गणेशाचे वाणीशी असलेले नाते पुढे शारदास्तवनात अधिक स्पष्ट होते.
३. गणेश म्हणजे अंतःकरणातील ज्ञानशक्ती
पुढील ओवीत समर्थ म्हणतात–
तुझिये कृपेचेंनि बळें ।
विटुळती भ्रांतीचीं पडळें ।
आणि विश्वभक्षक काळें ।
दास्यत्व कीजे ॥३॥
येथे अत्यंत सुंदर प्रतिमा आहे "भ्रांतीची पडळे"
पडदा म्हणजे वस्तू झाकणारे आवरण.
आत्मस्वरूप आहे → पण भ्रांतीने झाकलेले आहे.
गणेशकृपेने ही पडळे दूर होतात.
आणि मग समर्थ म्हणतात "विश्वभक्षक काळ" देखील दास्यत्व पावतो. म्हणजे मृत्यूची भीती, काळाची सत्ता, परिवर्तनाची भीती हे सर्व आत्मबोधाच्या प्रकाशात आपली सत्ता गमावतात.
अद्वैतात हे फार सूक्ष्म आहे. काळ देहाला भक्षतो; आत्म्याला नाही. म्हणून गणेश हा केवळ बाह्य विघ्नांचा नाश करणारा नसून मृत्यूभयाच्या मुळावर प्रहार करणारा बोध आहे.
४. मग समर्थ म्हणतात–
येता कृपेची निज उडी । विघ्ने कांपती बापुडी ।
होऊन जाती देशधडी । नाममात्रें ॥४॥
इथे "विघ्न" हा शब्द दोन स्तरांवर घ्यावा.
बाह्य विघ्न ,कार्यामध्ये येणारे अडथळे.
आंतरिक विघ्न अज्ञान ,संशय ,भीती, अहंकार, अस्थिरता मोह, विषयासक्ती
समर्थांच्या तत्त्वज्ञानात आतील विघ्न अधिक मूलभूत आहे. कारण बाहेरचा अडथळा दूर झाला तरी मनातील अज्ञान राहिले तर नवीन विघ्न उभे राहते.म्हणूनच पहिल्याच ओवीत त्यांनी "विघ्नहर्ता" म्हणण्यापूर्वी "अज्ञानभ्रांतिछेदका, बोधरूपा" म्हटले आहे. (क्रमशः)

## विचार ते विजय

लेखक - अमोल बोरीकर.मो. 86240 03013



### यश मिळवणं कठीण नाही, टिकवणं कठीण आहे

एखाद्या दिवशी अचानक आपलं नाव सगळ्यांच्या ओठांवर येतं...
आपल्या कष्टाचं कौतुक होतं...
अभिनंदनाचे फोन येतात...
फोटो काढले जातात...
फुलांचे गुच्छ मिळतात...
आणि मनाला वाटतं–
"मी जिंकलो!"
हो... तो क्षण सुंदर असतो.
वर्षानुवर्षांच्या कष्टानंतर मिळालेलं यश डोळ्यांत आनंदाश्रू आणतं.पण खरी गोष्ट त्यानंतर सुरू होते.
कारण यश मिळवण्यासाठी आपण जेवढी मेहनत केली, तेवढीच मेहनत ते टिकवण्यासाठीही करावी लागते. पद मिळाल्यावर नम्र राहणं.
पैसा आल्यावर माणसं न बदलणं.
प्रसिद्धी मिळाल्यावर अहंकाराला दूर ठेवणं.
व्यस्त असतानाही कुटुंबासाठी वेळ काढणं.
आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे–
ज्यांनी आपल्याला शून्यातून उभं केलं, त्यांना आपल्या शिखरावरून खाली पाहू न देणं.
कारण यशाची उंची किती आहे, यापेक्षा त्या उंचीवर पोहोचल्यावर आपण किती माणूस राहिलो, हे महत्त्वाचं आहे.
एक दिवस तुमचं ऑफिस दुसऱ्या व्यक्तीने भरलं जाईल. तुमची खुर्ची दुसरा कोणी सांभाळेल.
तुमचं पद कुणीतरी दुसरं भूषवेल.
पण तुमच्या मुलाच्या मनात जर अशी आठवण राहिली की–
"माझे बाबा कितीही व्यस्त असले तरी माझ्यासाठी वेळ काढायचे..."
तर समजा, तुम्ही आयुष्यातील सर्वात मोठं यश टिकवलं आहे. आई-वडिलांच्या चेहऱ्यावरचं समाधान, जोडीदाराच्या मनातला विश्वास, मुलांच्या आठवणीतला आपलेपणा, मित्रांच्या मनातला आदर आणि स्वतःच्या मनातली शांतता–
यापेक्षा मोठं कोणतंही यश नाही.
म्हणून धावा... मोठं व्हा... स्वप्नं पूर्ण करा... पैसा कमवा... नाव कमवा... पण या सगळ्या प्रवासात
आपली माणसं गमावू नका.
कारण आयुष्याच्या शेवटी बँक बॅलन्स मोजताना मनाला समाधान मिळेलच असं नाही...
पण एखाद्याच्या डोळ्यातून अश्रू येत म्हणताना –
"तो माझ्यासाठी खूप काही करून गेला..."
ही वाक्यं मिळाली,
तर समजा... तुम्ही फक्त यश मिळवलं नाही, तुम्ही ते आयुष्यभर टिकवलं.
यश टिकवताना फक्त पैसा, पद किंवा प्रतिष्ठा टिकवायची नसते. नातीही टिकवावी लागतात.
(क्रमशः)

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559

# के सेरा सेरा...!!

**ज्योतिर्मय साहित्य**

(मागील अंकावरून)

अर्थातच खरचं असलं मनासारखं घडेल कायं असा कठीण प्रश्न उपस्थित झाल्याने कवियित्री लहाणपणी आईला विचारते, साहजिकच मनातलं विचारायला आई शिवायं जवळचं दुसरं ते कोण असणारं. साधे शब्द, सहज सुलभ शैलीमुळे अर्थपूर्ण असलेल्या काव्यातील या ओळी समजायला सोपी जरी असल्या तरी उत्कंठावर्धक नी भावस्पर्शी भासतात. आईला बालमनाच्या संवेदना लक्षात येताच ती उत्तरते.

के सेरा सेरा
व्हाट एव्हर विल बी विल बी
दि फ्यूचर नाट अवर्स टू सी
के सेरा सेरा
व्हाट विल बी विल बी

अगं जे व्हायच असते, ते घडणारच असते, आपलं भविष्य बघायचं नसतं. वर्तमानातील जीवनशैली हेच जीवनातील खरं चित्रण आहे, भविष्यातील घटनेचं अग्रिम प्रतिबींब आहे, ते बघण्यापेक्षा ते घडवून जास्त महत्वाचे, नाही कायं, वर्तमानातील भरलेले कर्तृत्वाचे रंग भविष्यातील सप्तरंगी इंद्रधनुष्य साकारतं, त्यामुळे सतत क्रियाशील रहावं, भविष्य हे बघण्यासाठी नसून घडविण्यासाठी आहे.

आई प्रगल्भ आहे. जीवनातील चढ उतार तिनं बघितलेले आहे. मुलांना विकसित करणं, पायावर उभं करणं ही ती चांगली जाणून आहे. उगाचचं स्वप्नील जीवनातील सूख मुलांना दाखवून वास्तविकता लपवून ठेवणं म्हणजे मुलाचे आयुष्य घडविणं नव्हे, किती प्रगल्भतेने ती परखडपणे समजावून सांगत आहे. जगण्याचे वास्तविक रंग उजागर करित आहे. समर्पक उत्तरा मधून ती संकेत आणि संदेश प्रसारित करित आहे याची जाणीव होते. वेळ कुणासाठी थांबत नाही. ऋतुमान बदलतं, वयं वाढत जातं, लक्षात सुध्दा येत नाही. अशातच कवियित्री तारुण्यात पाऊल ठेवते, नी मग तिला परत प्रश्न पडतो. कालाचे ओघात आईचं अस्तित्व जगातून संपलेलं असतं, निसर्ग नियमानूसार ती प्रेमात पडते आणि जिवलग सख्यास प्रश्न विचारते.

व्हेन आय वाझ यंग आय फेल इन लव्ह
आय आस्क् माय स्वीटहार्ट व्हाट लाइज अहेड
विल वुई हैव रेनबो डे आफ्टर डे
हियर व्हाट माय स्वीटहार्ट सेड

काय रे, दिवसागणिक आपल्या आयुष्यात इंद्रधनुष्याचे सप्तरंग खुलतील नां. आपल्या प्रेममयी जीवनात क्षणोक्षणी प्रेमाचे हे मनभावन रंग असेच उधळत राहणार नां. कवितेतील चार ओळी या तारुण्यात जीवनाविषयी




असलेल्या भावना अतिशय प्रभावशाली पध्दतीने उजागर करतात. विषेश म्हणजे त्या मंत्रमुग्ध असलेल्या कालावधीत सर्वांनाच असा प्रश्न पडतो आणि हे गाणं केवळ चित्रपटातील न राहाता सर्व सामान्य जीवनात उतरतं.

हृदयस्पर्शी प्रिती स्वर्गिय अनुभूती, प्रेम म्हणजे काय असतं, तुमचं आमचं सेम असतं, असं ऐकण्यात आहे. प्रेमाचे रंग जरी विविधांगी असले तरी अनुभूती मात्र एकच, निस्पृह निरपेक्ष समर्पित भावना नी सर्वकश विश्वास आणि या विश्वासाचे पोटीच ती प्रियकराला विचारते नां. तारुण्य हे असचं असत, पळत्या कान भरलेल्या हरणा सारखं, सतत धावत असतं, नवीन आशा आकांक्षा नी स्वप्न उराशी घेऊन, भविष्यातील अंतहिन क्षितिजा कडे, तारांगणातील प्रकाश पर्वाकडे पणं खरोखरचं असलं उद्दिष्ट केवळ स्वप्नी रममाण होऊन किंवा वांझोट्या मनोगतानं साध्य तर होणार नाही. मगं एकचं गोष्ट हातात असते, ती म्हणजे जे आहे त्यामध्येच रंग फ ुलविण्याचा प्रयत्न करणं. सुख समृध्दीचं इंद्रधनुष्य वर्तमानातील राहणीमानात फुलवनच योग्य राहील आणि हीच महत्वाची वास्तविक बाब तिचा प्राणसखा तिला समजून सांगतो. के सेरा सेरा म्हणजेच जे घडायचं असेल ते घडणारच, मग तसला विचार करुन चिंताग्रस्त होऊन काय हासिल होणार आहे. भविष्य आपल्या हातात असतयं, ते पहायचं नाही घडवायचं असतयं. तो अगदी सहज सुंदर साध्या पण मनभावन सुरांनी तिची समजूत घालतो.

के सेरा सेरा
व्हाट एव्हर विल बी विल बी
दि फ्यूचर नाट अवर्स टू सी
के सेरा सेरा
व्हाट विल बी विल बी

भविष्यावर प्राण सख्यान भाष्य तिला सुध्दा पटतयं. लहान असतांना आईनं जे सांगितलं तेच आता तारुण्यात सुध्दा म्हटल्या जात आहे. ती आश्वस्त होते. व्यक्ती जरी भिन्न असल्या तरी संदर्भ मात्र एक आणि फक्त एकचं आहे. पण कितीही टाळलं तरी हा अनुत्तरित प्रश्न परत परत जीवन प्रवाहात अकस्मात उपस्थित होतोचं, आ वासून समोर येतोच, असेच म्हणावे लागेल. उतारवयात तिची स्वतःची मुलं हाच प्रश्न तिच्या समोर घेऊन उभे राहतात.

नाऊ आय हैव चिल्ड्रेन आफ माय ओन
दे आस्क देअर मदर व्हाट विल आय बी
विल आय बी हैंडसम विल आय बी रिच




आय टेल देम टेंडरली

पण ती आता सावरली होती, अनुभवानं पारित झालेली ती रहस्यमयी जीवनाच यशस्वी सूत्र शिकलेली होती, त्यामुळे विनाविलंब ती अनुभवाचे बोल सांगू शकली. आईनं आणि प्राणप्रिय जीवनसाथी यांनी भविष्यातील अगम्य घटनेतील जे मर्म तिला समजावून सांगितल होतं, तेच आता ती मुलांना समजावून सांगत आहे.

के सेरा सेरा
व्हाट एव्हर विल बी विल बी
दि फ्यूचर नाट अवर्स टू सी
के सेरा सेरा
व्हाट विल बी विल बी

सन एकोणविसशे छप्पन साली,''अ मैन नोज टू मच,''या हॉलीवूड चित्रपटातील हे गीत वास्तविक जीवनाचे पटलावर सुध्दा मार्गदर्शक तत्व म्हणून गणल्या जाते. डोरीस डे यांनी चित्रपटातील कथेला अनुसरून अत्यंत प्रभावी व समर्थपणे अभिनय साकार करीत रुपेरी पडद्यावर हे गीत गायलेले आहे. सदर गाण्याला अकॅडमी अवार्ड देवून सन्मानित केलेले आहे. आजही हे गीत ऐकतांना मानवी मन एका वेगळ्याच भावविश्वात हरवितांना दिसत. के सेरा सेरा हे गेयतापूर्ण असलेलं वाक्य स्पैनीश भाषेतील असून जे व्हायचं असतं ते होणारच किंबहूना घडणारचं असतं असा त्याचा अर्थबोध होते. अत्यंत कल्पकतेने वापरलेली ही शब्द पंक्ती गाण्यातील गुणवत्ता आणखी उंचीवर नेण्यात कारणीभूत ठरलेले आहे, त्यामुळे नादमय व तेवढीच रहस्यमयी असलेली ही कालजयी काव्य सरिता आजही सदाबहार आणि मनभावन असून अजरामर ,कालजयी व सदाहरित आहे.

# श्रावणकाव्य : पावसाच्या सरींपासून मनाच्या ओलाव्यापर्यंत

**ज्योतिर्मय साहित्य**

(मागील अंकावरून)

श्रावण आणि मराठी संस्कृती

या संग्रहाची दुसरी महत्त्वाची बाजू म्हणजे श्रावणाचा सांस्कृतिक संदर्भ. नागपंचमी, रक्षाबंधन, मंगळागौर, नारळी पौर्णिमा, कृष्णजन्माष्टमी, दहीहंडी, शिवपूजा, व्रतवैकल्ये अशा विविध परंपरांचे सुंदर दर्शन अनेक कवितांतून घडते.

'श्रावणोत्सवाचा निनाद'मध्ये बेलपत्र, शिवपूजन, नागपंचमी, नारळी पौर्णिमा, रक्षाबंधन आणि कृष्णजन्म यांची मालिका श्रावणाच्या सांस्कृतिक विश्वाची व्यापकता दाखवते.

'साजिरा श्रावण'मध्ये मेहंदी, हिरवा चुडा, बेलाचे पान, मंगळागौरीचे गान, माहेरची ओटी, झिम्मा-फुगडी आणि भाऊबहिणीचे नाते अशा प्रतिमांमधून स्त्रीजीवनाशी जोडलेला श्रावण प्रभावीपणे उभा राहतो.

यामुळे संग्रहातील श्रावण निसर्गचित्रासोबतच लोकसंस्कृतीचा उत्सव बनतो.

माहेर, नाती आणि स्त्रीमन

श्रावण आणि माहेर यांचे मराठी भावविश्वातील नाते अत्यंत जिव्हाळ्याचे आहे. संग्रहातील अनेक कवितांनी या नात्याला विशेष भावस्पर्शी रूप दिले आहे. झुला, सखी, माहेरची ओढ, भाऊ, राखी, लेकी-सुना, मंगळागौर अशा प्रतिमांतून स्त्रीच्या भावविश्वातील श्रावण खुलत जातो.

'बहारदार श्रावण'मध्ये सख्यांची वाट पाहणे आणि माहेरची ओढ व्यक्त होते. 'मनभावन श्रावण'मध्ये माहेरवाशिणीच्या मनमोराला झुलवणारा श्रावण, नात्यांचे वात्सल्य आणि संस्कृती-परंपरेचे जतन या गोष्टी एकत्र येतात.


त्यामुळे या संग्रहात श्रावण बाहेरच्या हिरवाई इतकाच अंतर्मनातील ओलाव्याचाही ऋतू ठरतो.

भक्ती आणि अध्यात्म

श्रावण म्हटले की शिवभक्ती आणि कृष्णभक्ती अपरिहार्यपणे येते. या संग्रहातही हा आध्यात्मिक पैलू अत्यंत सुंदरपणे खुलतो. ''हर हर महादेव'', बेलपत्र, जलाभिषेक, उपवास, देवघर, कृष्णजन्म, पंढरीची ओढ अशा प्रतिमा विविध कवितांमध्ये आढळतात.

'ओला श्रावण'मध्ये निसर्गानुभवातून सहजपणे भक्तीची अनुभूती निर्माण होते आणि पंढरीची ओढ जागृत होते. तर 'श्रावण व्हावी कविता'मध्ये कविता स्वतःच श्रावणातील भक्ती, मातीचा सुगंध, मोरपिसाचा स्पर्श आणि ऊन-पावसातील थेंब व्हावी, अशी सुंदर कल्पना आहे.

ही या संग्रहाची एक वैशिष्ट्यपूर्ण जमेची बाजू आहेश्रावण बाहेर बरसतो




आणि आत भक्ती म्हणून झिरपतो.

प्रेम, स्मृती आणि विरह

संग्रहातील श्रावण आनंद आणि उत्सवाबरोबरच आठवणी, प्रेम आणि विरहाच्या भावनांनाही सामावून घेतो. 'आठवणींचा श्रावण'मध्ये श्रावणाच्या हिरवाईत प्रिय व्यक्तीच्या आठवणी अधिक गहिऱ्या होतात.

'श्रावण का बरसला' ही कविता या दृष्टीने विशेष लक्षवेधी आहे. एकाच श्रावणाचा अनुभव कधी विरहाचा, कधी प्रेमाचा तर कधी सामाजिक वास्तवाचा संवेदनशील आविष्कार ठरू शकतो, अशी वेगळी भावछटा येथे दिसते. भग्न झोपडीचे चित्र आणि श्रावणाचा वर्षाव यांचा विरोधाभास कवितेला सामाजिक जाणिवेची अर्थपूर्ण किनार देतो.

यामुळे संग्रहातील श्रावण विविध भावछटांनी समृद्ध होऊन सुख-दुःखाच्या अनुभवांना सामावून घेतो.

ग्रामीण आणि प्रादेशिक श्रावण

'वऱ्हाडातला श्रावण' ही कविता या संग्रहाच्या दृष्टीने विशेष उल्लेखनीय आहे. वऱ्हाडची माती, हिरवी शिवारं, पराटी-सोयाबीन, मातीचा सुगंध, नागपंचमी, रक्षाबंधन, महादेवाचे गाणे आणि घरगुती पदार्थ यांमधून श्रावणाचा एक विशिष्ट प्रादेशिक चेहरा समोर येतो.

यातून एक महत्त्वाची जाणीव होतेश्रावण सर्वांचा असला तरी प्रत्येक प्रदेशाचा श्रावण वेगळ्या रंगांनी नटलेला असतो. ही प्रादेशिकता संग्रहाच्या अनुभवविश्वाला अधिक जिवंत आणि वैविध्यपूर्ण बनवते.

आधुनिकतेकडे वळणारा श्रावण

संग्रहातील आशयघन कवितांपैकी एक म्हणजे 'एके काळी श्रावण होता'. येथे कवी भूतकाळातील ओला, मोहक, हिरवा आणि जप-तपांनी भरलेला श्रावण आणि वर्तमानातील धावपळीच्या जीवनात बदलत गेलेला श्रावण यांची अर्थपूर्ण तुलना करतो.

याच चिंतनाला आणखी व्यापक आणि समकालीन रूप 'आजचा श्रावण...'या अंतिम कवितेत मिळते. बारा मजली इमारतीत राहणाऱ्या आधुनिक माणसाला गावची हिरवाई, इंद्रधनुष्य, झरा आणि निसर्ग यांची नव्याने जाणीव होते. शेवटी कवी केवळ कवितेतला गोड श्रावण न अनुभवता, माणसाच्या जीवनात निसर्गाचे खरे स्थान पुन्हा जागृत व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त करतो.

ही अंतिम कविता संपूर्ण संग्रहाला पर्यावरणीय आणि मानवी मूल्यांची चिंतनशील दिशा देते. त्यामुळे संग्रहाचा प्रवास ''पाऊस आला, हिरवाई आली'' इथून सुरू होऊन ''निसर्गाशी आपले नाते पुन्हा जपले पाहिजे'' या व्यापक जाणिवेपर्यंत पोहोचतो.

काव्यभाषा आणि शैली

संग्रहातील भाषा प्रामुख्याने सहज, सरळ, भावस्पर्शी आणि लोकाभिमुख आहे. अनेक कवितांमध्ये यमक,




पुनरुक्ती, अनुप्रास, लय आणि गीतात्मकता यांचा प्रभावी वापर आहे. ''रिमझिम'', ''झिम्मा'', ''फुगडी'', ''मोरपिसारा'', ''हिरवा शालू'', ''मृद्गंध'' अशा शब्दांमुळे श्रावणाचे श्रावणपण भाषेतच अनुभवता येते.

बहुकवी संग्रहाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक कवी आपल्या स्वतंत्र शब्दसंपदेतून आणि अनुभवविश्वातून श्रावणाला नवा अर्थ देतो. त्यामुळे एकाच ऋतूचे अनेक भाषिक आणि भावनिक रंग वाचकांसमोर खुलत जातात.

संग्रहाचे वैशिष्ट्य

'श्रावण काव्य'चे खरे महत्त्व केवळ एखाद्या एका कवितेच्या वैशिष्ट्यात नसून अनेक कवींच्या वेगवेगळ्या श्रावणानुभवांना एका काव्यछत्राखाली एकत्र आणण्यात आहे. कुणासाठी श्रावण म्हणजे निसर्ग, कुणासाठी भक्ती; कुणासाठी माहेर, कुणासाठी प्रेम; कुणासाठी शेतीचा आनंद, तर कुणासाठी निसर्गाशी पुन्हा जोडले जाण्याची उत्कट जाणीव.

या अर्थाने हा संग्रह श्रावणाचा एक काव्यमय कोलाज आहे.

विशेष म्हणजे संग्रहाच्या अनुक्रमणिकेत ९२ कविता असून त्यात 'वऱ्हाडातला श्रावण', 'आठवणींचा श्रावण', 'श्रावणोत्सवाचा निनाद', 'समजूतदार पाऊस', 'तुझे रूप श्रावणा', 'एके काळी श्रावण होता', 'आजचा श्रावण' अशा वेगवेगळ्या आशयदिशा दिसतात.

त्यात 'तुझे रूप हे श्रावणा सावळे' अशी कृष्णप्रतिमेशी जोडणारी कविता 'तुझे रूप श्रावणा' या संग्रहातील ७४व्या क्रमांकाच्या कवितेत दिसते. निसर्ग, माहेर, सख्या आणि कृष्ण यांना एकाच भावविश्वात आणण्याची ही रचना संग्रहाच्या भक्ती-प्रेम-निसर्ग या त्रिसूत्रीचे सुंदर प्रतिनिधित्व करते.

समारोप

एकूणच 'श्रावण काव्य' हा केवळ पावसावरच्या कवितांचा संग्रह नाही; तो श्रावणाच्या निमित्ताने मराठी मनाच्या विविध भावस्थितींचा घेतलेला काव्यमय शोध आहे. पावसाच्या थेंबांपासून मातीच्या गंधापर्यंत, हिरवाईपासून सणसंस्कृतीपर्यंत, माहेरच्या ओढीपासून प्रेम-विरहापर्यंत आणि भक्तीपासून पर्यावरणीय जाणिवेपर्यंत या संग्रहाचा आवाका विस्तारलेला आहे.

या संग्रहातील कविता निसर्गाचे रमणीय चित्र रेखाटतात, सांस्कृतिक स्मृती जागवतात, मनाला प्रेमाची ओल देतात आणि आधुनिक जीवनातील निसर्गाच्या स्थानाचे संवेदनशील भान जागृत करतात. विशेषतः शेवटच्या 'आजचा श्रावण...' या कवितेने संग्रहाला दिलेली पर्यावरण-जाणीवेची आणि आत्मपरीक्षणाची दिशा महत्त्वपूर्ण आहे.

म्हणूनच 'श्रावण काव्य' हा सरींचा संग्रह नसून संवेदनांचा संग्रह आहे. बाहेर पडणारा पाऊस काही काळाने थांबतो; पण या कवितांमधून मनात उतरलेला श्रावण मात्र अधिक काळ टिकून राहतो.

## आदरणीय गुरु नाट्याचार्य श्रीमती आशा सुनील कुमार

लेखिका: डॉ मीना श्रीवास्तव ठाणे मो. 99201 67211





पुढे.....

१९८३ साली 'सुर शृंगार संसद, मुंबई' तर्फे 'शृंगार मणी', २००४ साली 'नाट्य रत्न' आणि २००६ साली 'नाट्य शिरोमणी' या पदव्यांनी त्यांना गौरवण्यात आले. १९८७ साली मुंबई विद्यापीठाच्या 'बॅचलर ऑफ फाईन आर्ट्स' (ललित कला स्नातक) अभ्यासक्रमात त्यांनी प्रथम क्रमांक पटकावला आणि 'श्री ए. नागेश्वर राव शिष्यवृत्ती' प्राप्त केली. रोटरी इंटरनॅशनलने त्यांना तीन प्रसंगी 'व्यावसायिक उत्कृष्टता' (व्होकेशनल एक्ससेलेंस) पुरस्कार प्रदान केला. १९ मार्च २०२५ रोजी त्यांना तक्षशिला नृत्य कला मंदिर या संस्थेचा मानाचा शैलूशी पुरस्कार प्रदान करण्यात आला.


अत्यंत सखोल स्तरावर आत्मसात केलेल्या भरतनाट्यम या अभिजात नृत्याला गुरु आशा कथा, भावना आणि तंत्राची एक निरामय, प्रभावी, आणि परिणामकारक भाषा मानतात. त्यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनाखाली औपचारिक मंच, मंदिरांचे सभागृह, इतकेच नव्हे तर अगदी रोड शो सारख्या विविध स्थानी सादर केल्या गेलेले अनेक भरतनाट्यम कार्यक्रम आणि अरंगेत्रम पाहिल्यानंतर, त्यांच्या शिष्यांचे सुरेखरित्या समन्वित आणि अचूक तालबद्ध नृत्यविभ्रम मला सर्वाधिक प्रभावित करून गेले. त्यांच्या द्वारे संयोजित नृत्यरचना प्रेक्षकांसाठी गीतांचा आणि सुरांचा सकल अर्थ एका दृकश्राव्य मेजवानीत रूपांतरित करतात. जेव्हा या गुणनिधान गुरूंकडून प्रशिक्षित झालेल्या विद्यार्थिनी एकापाठोपाठ एक चैतन्यमय, लयबद्ध, चित्तथरारक आणि अलौकिक नृत्याविष्कारांनी प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करतात, तेव्हा या प्रख्यात गुरूंनी रचलेल्या निपुण व नाविन्यपूर्ण नृत्यरचनांचे भरभरून कौतुक करण्याशिवाय प्रेक्षकांकडे पर्यायच नसतो. फेब्रुवारी १९९८ मध्ये गुरु आशा मॅडम यांनी ठाण्यातील लोकपुरम येथे 'संस्कृती अकादमी ऑफ फाईन आर्ट्स'ची स्थापना केली. तेव्हापासून या प्रशिक्षणाचा प्रवास अविरत सुरु आहे. केवळ दहा विद्यार्थिनींपासून सुरू झालेल्या विद्यार्थिनींची संख्या आता ८०० वर पोहोचली आहे. आजवर गुरु आशा मॅडम यांनी १२० हून अधिक अरंगेत्रमद्वारे मंचावर प्रवेश करणाऱ्या नवोदित शिष्यांना मार्गदर्शन केले आहे. यांपैकी काही प्रतिभावान शिष्या ही परंपरा पुढे नेत आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रस्थापित कलाकार म्हणून नावारूपाला आलेल्या आहेत. आंतरराष्ट्रीय नृत्य परिषदेची प्रतिष्ठित सदस्य म्हणून, संस्कृती अकादमी आपल्या विद्यार्थिनींना नृत्यप्रशिक्षणात आंतरराष्ट्रीय प्रमाणपत्र प्रदान करते. (क्रमशः)

## अष्टविनायक महिमा
## बल्लाळेश्वर

सौ.माधुरी पळणिटकर मो.९९२१४९५५३३



महाराष्ट्रातील प्रसिध्द अष्टविनायका पैकी हे एक महत्त्वाचे स्थान असून ते रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यात पाली या गावात वसलेले आहे. पौराणिक कथेनुसार, पाली गावात कल्याण नावाचा एक श्रीमंत व्यापारी व त्याची पत्नी इंदुमती रहात होते. त्यांचा मुलगा बल्लाळ हा लहानपणा पासूनच गणेश भक्त होता. आपल्या मित्रांसह जंगलात एका दगडाला गणपती मानून त्याची भक्तिभावाने तो पूजा करायचा. गावातील पालकांनी कल्याण वाण्याकडे मुलाची तक्रार केली. तेव्हा संतापलेल्या कल्याण वाण्याने जंगलात जावून मुलांची पूजा उद्ध्वस्त केली. बल्लाळाला रक्बंबाळ होईपर्यंत मारले. अत्यंत वेदनेत असतानाही बल्लाळाने अखंडपणे गणपतीचा जप सुरू ठेवला. त्याच्या या असीम भक्तीवर प्रसन्न होवून भगवान गणेश एका ब्राह्मणाच्या वेशात प्रकट झाले आणि बल्लाळाला त्यांनी वर मागण्यास सांगितले, तेव्हा बल्लाळाने प्रार्थना केली, की 'तुम्ही याच ठिकाणी कायमचे वास्तव्य करावे आणि भक्तांची संकटे दूर करावीत. त्यावर गणपतीने त्याची इच्छा मान्य केली आणि ते म्हणाले माझ्या नावाच्या आधी तुझे नाव घेतले जाईल व मी 'बल्लाळ विनायक' या नावाने कायमचे वास्तव्य करीन. भाद्रपद शुध्द चतुर्थीला जे भक्त येथे येतील त्यांच्या सर्व मनोकामना पूर्ण होतील असे गणेशाने वरदान दिले. या मंदिरची रचना वैशिष्ट्यपूर्ण आहे. जेव्हा सूर्य उगवतो तेव्हा त्याची किरणे मूर्तीच्या अंगावर पडतात. स्वयंभू असलेल्या या मूर्तीचे डोळे हिऱ्यापासून बनवले आहेत. असा हा बल्लाळेश्वराचा इतिहास आपल्याला भक्तीत समर्पण किती महत्त्वाचे आहे हे शिकवून जातो. दगडातही देव आहे ही श्रध्दा व त्याची भक्तिभावाने पूजा मग ती साधी केली तरी मनोभावे करावी हे भक्त बल्लाळाच्या कथेमधून आपल्याला समजते. आज मंडळा-मंडळामध्ये कोणाची आरास जास्त सुंदर अशी स्पर्धा सुरू आहे, ती चुकीची आहे. मुळात गणेशोत्सवात मंडळाकडून विविध समाज प्रबोधन करणारे कर्यक्रम जर आखले तर उत्सव व संस्कृती या दोन्ही गोष्टींचा सुंदर मिलाफ सर्वांना पाहण्यास मिळेल. आरास, डेकोरेशन यासाठी करोडो रुपये खर्च करण्यापेक्षा तोच खर्च दिव्यांग, वृध्द, गरीब व्यक्तींवर केला तर मंडळाकडून सामाजिक कार्य झाले याचा अभिमान सर्वांना वाटेल. चांगल्या विचारांची-श्रध्देची फुले गणपतीस अर्पण केली तरी तो पावतो हेच बल्लाळेश्वराचा इतिहास सांगतो.







2026

भाद्रपद शुक्ला सप्तमी, {दिनांक : १८ सप्टेंबर २०२६}

## तिसरा आत्मधर्म : उत्तम आर्जव धर्म

आर्जव म्हणजेच सरलता. अर्थात् वक्रतेचा अभाव. उत्तम आर्जव धर्मामध्ये मन, वचन, काया यांची सरलता अपेक्षित आहे. _माया_ या कषायाच्या अभावात आत्म्यामध्ये जो सरल शांतिरूप स्वभाव प्रकट होतो त्याला उत्तम आर्जव धर्म असे म्हणतात. मायाचार, छळ, कपट हीच स्वभावात वक्रता असते, या वृत्तीचा अभाव झाल्याने सरल स्वभाव ही आत्मवृत्ति प्रकट होते.

आचार, विचार आणि उच्चार यामध्ये एकीभाव असल्यास व्यक्ती व्यवहारांमध्ये उत्कृष्ट व सामाजिक क्षेत्रामध्ये आदरणीय गणला जातो. या ऐवजी मनात एक, बोलण्यात दुसरे आणि आचरणात मात्र प्रत्यक्ष वेगळेच काहीतरी, अशा वर्तनाने अपकीर्ती होते. म्हणून आत्महिताची इच्छा असलेल्यांनी या सरला स्वभावाचा म्हणजेच उत्तम आर्जव धर्माचा अवलंब करावा.

छळ-कपट, मायचारी वृत्ती हा आत्म्याचा स्वभाव नसून विभाव आहे. याउलट सरलता हा आत्म स्वभाव आहे. सरलता हा दर्शन विचार, ज्ञान आणि चारित्र्याचा स्वच्छ प्रवाह आहे. कपट करणे ही अत्यंत लाजिरवाणी गोष्ट आहे. ते उघडकीला आल्यास अनेक दिवसांचे नाते संबंध संपुष्टात येतात. इतरांचे गुण लपवून केवळ दोष प्रकट करण्यात कित्येकांना फार आनंद होत असतो, म्हणूनच सरलतेच्या अभावामध्ये मायाचाराने कृती करत असताना अत्यंत घोर अशा कर्माचा बंध होऊन त्याच्या परिणाम स्वरूप उदयकाळात मोठ्या मानहानीला सामोरे जावे लागते. इहलोक आणि परलोकाचे नुकसान मन,वचन आणि कृतीत एकता नसल्याने होत असते. म्हणूनच संसारामध्ये यश-कीर्ति, अध्यात्मिक प्रगतीसाठी उत्कृष्ट दर्शन, ज्ञान आणि चारित्र्याची प्राप्ती करण्याकरिता सरलता म्हणजेच उत्तम आर्जव धर्म हा आत्म स्वभाव प्रकट होणे अत्यंत गरजेचे आहे.

बलराज संघई, छत्रपती संभाजीनगर 9420015208

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559

# मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त पी.यू. जैन विद्यालयात ध्वजारोहण समारंभ उत्साहात

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर – जैन शिक्षण संस्था संचलित पी.यू. जैन विद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त गुरुवार, १७ सप्टेंबर २०२६ रोजी ध्वजारोहण समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

थोर श्रावक श्री. मिठालाल रतनलाल कांकरिया यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जैन शिक्षण संस्थेचे अध्यक्ष महावीर सेठी होते. प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र







ग्रामीण बँकेचे विभागीय व्यवस्थापक म्हणून सेवानिवृत्त झालेले गंभीरराव रावसाहेब देशमुख, तसेच जयंत भिलेगावकर, म.रा.परिवहन मंडळाचे सेवानिवृत्त लेखापाल गणेश सुरोडकर, रवी अय्यर आणि ललित पाटणी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर मराठवाडा मुक्ती संग्रामातील अग्रणी स्वातंत्र्यसेनानी स्वामी रामानंद तीर्थ व माणिकचंद पहाडे यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी मराठवाडा गीत व स्वागतगीत सादर करून मान्यवरांचे स्वागत केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे मुख्याध्यापक विजय पाटोदी यांनी केले. त्यांनी मराठवाडा मुक्ती संग्रामाचा इतिहास, स्वातंत्र्यसैनिकांचे योगदान तसेच नव्या पिढीने या इतिहासातून प्रेरणा घेण्याचे महत्त्व विशद केले.

यावेळी प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांनी मराठवाडा गीत, समूहगीत व विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास संस्थेच्या सचिव आशादेवी काला, कोषाध्यक्ष डॉ. रमेश बडजाते, ललित पाटणी, सावंत चुडीवाल, कविता ठोळे, उषा कासलीवाल यांच्यासह मुख्याध्यापक विजय पाटोदी, प्राथमिक, माध्यमिक व जैन बालक मंदिरातील शिक्षकवृंद, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विशाल पाटणी व निलेश छाबडा यांनी केले, तर आभार मुख्याध्यापक विजय पाटोदी यांनी मानले. मराठवाडा मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाचे स्मरण आणि इतिहासाची जाणीव करून देणाऱ्या या कार्यक्रमामुळे विद्यालय परिसरात देशभक्तीमय वातावरण निर्माण झाले.

# भगवान विश्वकर्मा जयंतीचा दिवस ‘‘राष्ट्रीय श्रमिक दिन’’ म्हणून घोषित करावा भारतीय मजदूर संघाची मागणी

## भारतीय मजदूर संघ पुणे जिल्ह्याच्या वतीने जिल्हाधिकारी व तहसीलदारांमार्फत पंतप्रधानांना निवेदन

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे – भगवान विश्वकर्मा जयंतीचा दिवस असलेला १७ सप्टेंबर हा दिवस ‘‘राष्ट्रीय श्रमिक दिन’’ म्हणून अधिकृतपणे घोषित करण्यात यावा, या प्रमुख मागणीसाठी भारतीय मजदूर संघ, पुणे जिल्ह्याच्या वतीने पुणे जिल्हाधिकारी कार्यालय तसेच जिल्ह्यातील विविध तहसीलदार कार्यालयांमार्फत मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांना निवेदन सादर करण्यात आले.

तसेच, पुणे येथील विश्वकर्मा भवन, भारतीय मजदूर संघ कार्यालयात भगवान विश्वकर्मा यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी वंचित, शोषित व कंत्राटी कामगारांसह सर्व श्रमिकांना न्याय, सामाजिक सुरक्षा आणि सन्मान मिळवून देण्यासाठी संघटितपणे कार्य करण्याचा निर्धार करण्यात आला. तसेच जिल्ह्यातील विविध उद्योगातील सरकारी, निमशासकीय, सार्वजनिक उपक्रम, खाजगी ओद्यौगीक आस्थापनेत




उत्साहात संपन्न करण्यात आला.

भारतीय मजदूर संघाच्या वतीने दरवर्षी १७ सप्टेंबर रोजी भगवान विश्वकर्मा जयंती श्रमिक दिन म्हणून साजरी करण्यात येते. भगवान विश्वकर्मा हे निर्मिती, कौशल्य, तंत्रज्ञान, उद्योग आणि श्रमाचे प्रतीक मानले जातात. देशाच्या आर्थिक, औद्योगिक आणि पायाभूत विकासामध्ये कामगार, कारागीर, तंत्रज्ञ, अभियंते तसेच विविध क्षेत्रांतील श्रमिकांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

देशाच्या विकास प्रक्रियेत श्रमिकांच्या श्रम व कौशल्याचा राष्ट्रीय स्तरावर गौरव व्हावा, श्रमप्रतिष्ठेची भावना अधिक दृढ व्हावी आणि भावी पिढ्यांमध्ये कौशल्य व श्रमाबद्दल सन्मानाची भावना निर्माण व्हावी, या उद्देशाने १७ सप्टेंबर हा दिवस ‘‘राष्ट्रीय श्रमिक दिन’’ म्हणून घोषित करावा, अशी मागणी भारतीय मजदूर संघाने केंद्र सरकारकडे केली आहे.

या मागणीचे निवेदन पुणे जिल्हाधिकारी कार्यालय तसेच जिल्ह्यातील विविध तहसीलदार कार्यालयांमार्फत केंद्र सरकारकडे पाठविण्यात आले आहे. ‘‘राष्ट्रहित, उद्योगहित व कामगारहित’’ या त्रिसूत्रीच्या माध्यमातून भारतीय मजदूर संघ कामगारांच्या हक्क, सामाजिक सुरक्षा व कल्याणासाठी सातत्याने कार्यरत आहे.

यावेळी भारतीय मजदूर संघ पुणे जिल्ह्याचे अध्यक्ष अर्जुन चव्हाण, सचिव सागर पवार, भारतीय मजदूर संघ संघटन सचिव बाळासाहेब भुजबळ, अखिल भारतीय ठेका मजदूर महासंघाचे सरचिटणीस सचिन मेंगाळे, मीडिया प्रभारी निलेश खेडकर, रविंद्र देशपांडे, जिल्हा उपाध्यक्ष मनोज भदारके, उमेश विश्वाद, श्रीमती बेबीराणी डे , राम सरवसे , यश निंबाळकर यांच्यासह विविध संलग्न कामगार संघटनांचे पदाधिकारी, कामगार प्रतिनिधी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# वैजापूर शहर व तालुक्यातील ग्रामीण भागात मराठवाडा(हैद्राबाद) मुक्ती संग्राम दिन उत्साहात

**ज्योतिर्मय साहित्य**

वैजापूर – मराठवाडा (हैद्राबाद) मुक्ती संग्राम दिनानिमीत्त वैजापूर शहरातील शासकीय, निमशासकीय कार्यालये व शैक्षणिक संस्थात तसेच ग्रामीण भागातील शैक्षणिक संस्था, व कार्यालयात गुरुवार(ता,१७) रोजी सकाळ साडेसात पासून साडे आठ पर्यंत ध्वजवंदन करण्यात आले मुख्य शासकीय ध्वजवंदन उपजिल्हाधिकारी कार्यालयात उपविभागीय दंडाधिकारी डॉ.अरुण जऱ्हाड यांच्या हस्ते उपविभागीय कार्यालयात झाले. नगर पालिकेत, नगराध्यक्ष डॉ.दिनेश परदेशी. हुतात्मा जगन्नाथ भालेराव स्मृती स्तंभ प्रांगणात वीरपत्नी श्रीमती लक्ष्मीबाई जयराम भोसले यांच्या हस्ते, तसेच पंचायत समिती त सभापती वंदना शिंदे, उपसभापती सोनाली जाधव, तहसील कार्यालयात तहसीलदार सुनील सावंत. पोलीस स्टेशन व उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयात उप विभागीय पोलीस अधिकारी भागवत फुंदे, तर विनय सोनावणे यांनी ध्वजवंदन केले. या प्रसंगी मुख्याधिकारी भागवत बिघोत राजपूत, सेवा निवृत्त शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत, उपनगराध्यक्ष रियाज अकिल शेख, गटविकास अधिकारी श्री जायभाए, पॅरा मिलिटरीचे जवान मेजर गौतम गायकवाड, नगरसेवक दशरथ बनकर, ज्योती जोशी, श्रीमती कविता शिंदे, अशोक पवार, नायब तहसीलदार रामेश्वर महाजन, पोलीस उप निरीक्षक मनीषा जगताप, नगरसेवक विशाल संचेती, राजेश गायकवाड, बाबासाहेब गायकवाड, डॉ.निलेश भाटीया, जेष्ठ नागरिक साहेबराव साळुंके, अशोक धसे, कमलाबाई लोंढे, दीपक राजपूत, श्री. मिटकरी, यांच्या सह सामाजिक कार्यकर्ते,



नगरसेवक, पारस घाटे, बाबासाहेब पुतळे, श्री. थोरात, मंगेश नाईकवाडी, मंडळ अधिकारी श्रीमती पुरी, निर्मला जाधव यांच्या सह नागरिक, कर्मचारी,

# श्री गणेशाच्या जयघोषात ‘‘मोरया‘‘ केव्हां पासून. ?

**ज्योतिर्मय साहित्य**

सदभक्ताचे नाव जोडले गेले सर्व देवता मधील प्रथम पूजनीय श्री गणेश देवाच्या सोबत ‘‘बाप्पा‘‘ हा शब्द अर्थात विशेषण हे पितृ स्थानी व पितामह,वडील, सर्व भक्त जीवांचा तारक या अर्थाने, नात्याने जोडले गेले.

संस्कृतमधील पितामह किंवा बाप (वडील) या शब्दांवरून आणि प्राकृत बोली लोकभाषेच्या प्रवाहातून गणपतीसोबत बाप्पा हा आदरयुक्त आणि आपुलकीचा शब्द जोडला गेला.

श्री गणेशाचा जयघोष करताना ‘‘गणपती बाप्पा मोरया‘‘ असेही आपण म्हणतो. हे मोरया विशेषण कशामुळे? याचेच विश्लेषण या लेखामध्ये आहे.

श्री गणपतीसोबत जोडला गेलेला मोरया हा शब्द १४ व्या शतकातील थोर गणेशभक्त श्री मोरया गोसावी यांच्या नावावरून आला असून तो नंतर गणपती बाप्पा मोरया या जयघोषात समाविष्ट झाला. मंगलमूर्ती मोरया! अशा जयघोषांनी प्रत्येक घराघरात निनादतो.

**चिंचवड पुण्याचे गणेश भक्त श्री मोरया गोसावी आणि त्यांची भक्ती :**

‘मोरया’ या शब्दाचा संबंध थेट त्यांच्याशी आहे. ऐतिहासिक नोंदींनुसार, १४ व्या शतकात (सुमारे १३७५ च्या सुमारास) मोरया गोसावी यांचा जन्म झाला. त्यांचे आई-वडील वामन भट आणि पार्वतीबाई हे देखील गणपतीचे अनन्य भक्त होते. असे मानले जाते की, त्यांच्या कठोर तपश्चर्येवर आणि भक्तीवर प्रसन्न होऊन भगवान गणेशाने त्यांच्या पोटी जन्म घेण्याचे वरदान दिले होते.

मोरया गोसावी हे लहानपणापासूनच गणपतीच्या भक्तीत तल्लीन असायचे. ते दरमहा गणेश चतुर्थीच्या दिवशी चिंचवडहून अष्टविनायकांपैकी एक असलेल्या मोरगावच्या श्री मयुरेश्वर मंदिराचे दर्शन घेण्यासाठी तब्बल ९५ किलोमीटर अंतर अनवाणी पायांनी चालत जात असत. मयुरेश्वर भगवान हे मोरावर आरूढ असणारे गणेशाचे रूप मानले जाते.

**मयुरेश्वराचा दृष्टांत आणि तलावातील स्वयंभू मूर्ती :**



मोरया गोसावी यांनी ही खडतर वारी सलग ११७ वर्षे अखंडपणे चालू ठेवली. जसजसे त्यांचे वय वाढत गेले, तसतसे शरीर थकले आणि ९५ किलोमीटरची पायपीट करणे त्यांना अशक्य होऊ लागले. आपल्या लाडक्या भक्ताचे हे कष्ट पाहून भगवान मयुरेश्वर प्रसन्न झाले. एके रात्री भगवान गणेशाने मोरया गोसावी यांच्या स्वप्नात येऊन दृष्टांत दिला, ‘‘हे भक्ता ! आता तुला मोरगावला येण्याची गरज नाही. उद्या सकाळी जेव्हा तू चिंचवडच्या पवना नदीत/तलावात स्नान करून बाहेर येशील, तेव्हा मी स्वतः तुझ्यासमोर प्रकट होईन.’’

दुसऱ्या दिवशी सकाळी जेव्हा मोरया गोसावी स्नानासाठी तलावात उतरले आणि बाहेर आले, तेव्हा त्यांच्या हातात भगवान गणेशाची एक लहान, अत्यंत तेजस्वी मूर्ती आपोआप आली. ती मूर्ती साक्षात मोरगावच्या मयुरेश्वराचेच रूप होती. मोरया गोसावी यांनी त्या मूर्तीची स्थापना चिंचवड येथे केली.

**गणपती बाप्पा मोरया’ जयघोषाची सुरुवात**

चिंचवडमध्ये मूर्तीची स्थापना झाल्यानंतर दूरदूरवरून भाविक तिच्या दर्शनासाठी येऊ लागले. लोक जेव्हा मोरया गोसावी यांच्या दर्शनाला जात, तेव्हा मोरया गोसावी ‘‘गणपती बाप्पा’’ असा जप करत असत आणि भाविक त्यांच्या सन्मानार्थ ‘‘मोरया’’ असा प्रतिसाद देत असत. हळूहळू देव आणि भक्ताचे नाव एकमेकांत इतके विलीन झाले की, लोक गणपतीचा जप करताना ‘‘गणपती बाप्पा मोरया’’ असा एकत्र जयघोष करू लागले.




चिंचवड येथील गणेश मूर्ती आणि मोरगावचा मयुरेश्वर यांच्यात कोणतेही अंतर नाही अशी श्रद्धा विद्यमान आहे. आजही मोरया गोसावी यांच्या संजीवन समाधी मंदिरातून दरवर्षी पालखी मोरगावच्या मयुरेश्वर मंदिराकडे जाते.

अशा प्रकारे एका भक्ताच्या निस्सीम भक्तीमुळे देवाच्या नावाआधी भक्ताचे नाव अमर झाले.

# ज्येष्ठा कनिष्ठा गौरींचे आगमन



सविता समाधान कुलकर्णी, नळदुर्ग



सारिका कोकीळ, सोलापूर



अनघा ठुसे, पुणे



मोहनीराज कुलकर्णी, छ.संभाजीनगर

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559